स्वाभिमानी
श्रमिक पत्रकार संघ (महाराष्ट्र राज्य)
संस्थापक / अध्यक्ष
डि.एस.लोखंडे-पाटील
मो.नं.९३७३५०४७४८

# दैनिक चालु वार्ता

एक पाऊल सत्याच्या शोधात! साथ तुमची! काम आमचं!
दैनिक चालु वार्ता
ह्या वृतपत्रासाठी संपुर्ण महाराष्ट्रात पत्रकार प्रतिनिधी नेमणूक सुरू आहे.
आपण इच्छुक असाल तर खाली दिलेल्या नंबर वरती कॉल किंवा व्हॉट्सअॅप करू शकता.
संपर्क : दै.चालु वार्ता, पुणे कार्यालय
Mob.: 9405617368 / 7447444962 / 7507503836
7887883863 / 7507505753 / 7219049014

✻ पुणे ✻ वर्ष : ५ ✻ मुख्य संपादक : डि.एस.लोखंडे पाटील ✻ अंक : १४७ ✻ बुधवार दि.२४ डिसेंबर २०२५ ✻ पाने : ०४ ✻ किंमत रु.३ ✻ RNI No.: MAHMAR/2021/82895
✻ Chief Editor : D.S.Lokhande Patil ✻ Pune ✻ Vol 5 ✻ Issue 147 ✻ Wednesday ✻ 24 December 2025 ✻ Pages 04 ✻ Price Rs.3 ✻ RNI No.: MAHMAR/2021/82895 ✻ E-mail : dainikchaluwartha@gmail.com
✻ पुणे ✻ नांदेड ✻ छ.संभाजीनगर ✻ बीड ✻ परभणी ✻ हिंगोळी ✻ जालना ✻ लातूर ✻ धाराशिव ✻ मुंबई ✻ पालघर ✻ ठाणे ✻ रायगड ✻ रत्नागिरी ✻ अहमदनगर ✻ सोलापूर ✻ सातारा ✻ अमरावती ✻ यवतमाळ ✻ वर्धा ✻ वाशिम ✻ चंद्रपूर ✻

# राहुल गांधींनी जर्मनीत उपस्थित केला ‘व्होट चोरी’चा मुद्दा

## देशाची बदनामी केल्याचा भाजपचा आरोप...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी जर्मनीत केलेल्या वक्तव्यांमुळे देशातील राजकारण तापले आहे. राजधानी बर्लिनमधील हर्टी स्कूल येथे १८ डिसेंबर रोजी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना राहुल यांनी भारतीय जनता पार्टी (भाजप) वर संविधानाची मूलभूत भावना संपवण्याचा आणि निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप केल्याचा गंभीर आरोप केला. त्यांच्या या वक्तव्यांवर भाजपने तीव्र प्रतिक्रिया देत चौफेर टीका केली आहे.

**काय म्हणाले राहुल गांधी ?**

राहुल गांधी १७ ते १९ डिसेंबरदरम्यान जर्मनी दौऱ्यावर होते. १८ डिसेंबर रोजी राहुल म्हणाले, संविधान सर्व नागरिकांना समान अधिकार देते, म्हणून भाजप हे संपवू इच्छिते. याशिवाय त्यांनी आरोप केला की, देशातील अनेक संस्थात्मक यंत्रणा भाजपच्या ताब्यात असून, सरकार ईडी आणि सीबीआय यांसारख्या तपास यंत्रणांचा वापर राजकीय शस्त्र म्हणून करत आहे.

**निवडणूक प्रक्रियेवरही प्रश्नचिन्ह**

राहुल गांधी यांनी निवडणूक प्रक्रियेवरही गंभीर शंका उपस्थित केल्या. त्यांनी दावा केला की, हरियाणामध्ये काँग्रेस निवडणूक जिंकली होती, मात्र निकाल बदलण्यात आले. तसेच महाराष्ट्रातील निवडणुका निष्पक्ष नव्हत्या. देशातील कोट्यवधी नागरिकांची विचारधारा सरकार




आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघापेक्षा वेगळी असूनही त्यांचा आवाज दाबला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

**काँग्रेसकडून व्हिडिओ प्रसिद्ध**

काँग्रेस पक्षाने सोमवारी रात्री या संवादाचा सुमारे एक तासाचा व्हिडिओ प्रसिद्ध केला आहे. पक्षाच्या म्हणण्यानुसार, राहुल गांधी यांनी परदेशातही लोकशाही आणि संविधानाच्या संरक्षणाचीच भूमिका मांडली आहे, जी ते देशांतर्गत सातत्याने मांडत आले आहेत.

**भाजपचा आक्रमक प्रतिवाद**

राहुल गांधींच्या वक्तव्यांवर भाजपने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. भाजप अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जेपी नड्डा यांनी परदेशी भूमीवरून भारताविरोधात वक्तव्य करणे म्हणजे देशाचा अपमान असल्याचे म्हटले. जगातील २९ देशांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सर्वोच्च सन्मान दिला आहे, तर राहुल गांधी परदेशात जाऊन भारताची बदनामी करत आहेत, अशी टीका त्यांनी केली.

केंद्रीय मंत्री गिरिराज सिंह यांनी राहुल गांधींवर टीका करत म्हटले की, RSS समजून घेण्यासाठी राहुल गांधींना अनेक जन्म घ्यावे लागतील. केंद्रीय मंत्री शोभा करंदलाजे यांनी राहुल गांधींना 'बालिश' म्हणत, अधिवेशन सुरू असताना परदेशात जाऊन देशाविरोधात वक्तव्य करणे गैरजबाबदार असल्याचे म्हटले. याशिवाय, भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते गौरव भाटिया यांनी राहुल गांधींची तुलना मीर जाफरशी करत, देशविरोधी शक्तींशी संबंध असल्याचा आरोप केला.

**हर्टी स्कूलवरूनही आरोप**

भाजपने राहुल गांधींच्या जर्मनी दौऱ्याबाबत आणखी एक गंभीर आरोप केला आहे. गौरव भाटिया यांनी दावा केला की, राहुल गांधी

(पान ३ वर...☞)

## ठाकरे बंधुंच्या युतीच्या घोषणेची वेळ आणि तारीख ठरली...



दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या युतीची चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून सुरूआहे. आगामी मुंबई महापालिकेच्या दृष्टीने दोन्ही पक्षातील नेत्यांसह प्रमुखांच्या भेटगाठी वाढल्या आहेत. यादरम्यान ठाकरे बंधु युतीची घोषणा कधी करणार? याबाबत विचारणा केली जात होती. अखेर ती तारीख अणि वेळ निश्चित झाली आहे. खासदार संजय राऊत यांनी स्वत: ट्वीट करत युतीच्या अधिकृत घोषणेची तारीख सांगितली आहे.

संजय राऊत यांनी त्यांच्या अधिकृत ट्वीटरवर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचा एक फोटो शेअर केला आहे. यात राज ठाकरे उद्धव ठाकरेंना पुष्पगुच्छ देत असल्याचे दिसत आहे. सोबतच या फोटोला कॅप्शन देत संजय राऊत यांनी ‘उद्या १२ वाजता’ असे लिहिले आहे. यावरून बुधवारी (दि. २४) दुपारी १२ वाजता मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे युतीची घोषणा करणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

**युती आणि जागावाटपाची घोषणा होण्याची शक्यता**

(पान ४ वर...☞)

# भारताशी समेट करा नाहीतर...

## दादा देशानं बांगलादेशला दाखवला आरसा; तणाव कमी करण्याचा सल्ला...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**बांग्लादेश :** बांग्लादेशमध्ये सध्या तणावपूर्ण परिस्थिती आहे आणि भारतासोबतचे त्यांचे संबंधही बिघडले आहेत. गेल्या काही काळात, बांगलादेशातील भारतीय दूतावासावर हल्ले झाल्याच्या आणि भारतविरोधी घोषणाबाजी झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. यासोबतच, बांगलादेशात अल्पसंख्याकांवर होणाऱ्या सततच्या हिंसाचारामुळे भारतातही मोठी नाराजी आहे. अशा परिस्थितीत, बांगलादेशातील रशियाचे राजदूत अलेक्झांडर ग्रिगोरीविच खोजिन यांनी दोन्ही देशांमधील तणाव कमी करण्याची विनंती केली आहे.

**राजदूत काय म्हणाले ?**

बांगलादेशातील रशियाचे राजदूत अलेक्झांडर ग्रिगोरीविच खोजिन यांनी सोमवारी बांगलादेशला तणाव कमी करण्याचे आवाहन केले. पुढील वर्षी १२



फेब्रुवारी रोजी होणाऱ्या राष्ट्रीय निवडणुकांपूर्वी चांगले वातावरण तयार व्हावे, अशी त्यांची अपेक्षा आहे. त्यांनी भारतासोबतचा तणाव कमी करण्याच्या महत्त्वावरही जोर दिला. बांगलादेशातील रशियन राजदूत म्हणाले की, हे जितक्या लवकर होईल तितके चांगले. त्यांनी स्पष्ट केले की ते दोन्ही देशांच्या आपापसातील संबंधांमध्ये हस्तक्षेप करत नाहीत, परंतु त्यांना वाटते की असा मार्ग काढणे शहाणपणाचे ठरेल, ज्यामुळे तणाव सध्याच्या पातळीपेक्षा पुढे वाढणार नाही. त्यांनी असेही म्हटले की, संबंध हे परस्पर विश्वास आणि समजुतीवर आधारित असले पाहिजेत.

**आंदोलन सुरू ठेवण्याचं कारण काय?**

बांगलादेशातील होऊ घातलेल्या निवडणुकांबद्दल बोलताना, राजदूतांनी आशा व्यक्त केली की मतदान वेळेवर होईल. निवडणूक निरीक्षकांना पाठवण्याबाबत विचारले असता, राजदूत म्हणाले की ते निवडणूक आयोगाच्या संपर्कात आहेत आणि आयोगाकडून अधिकृत निमंत्रणाची वाट पाहत आहेत. किमान निवडणुकांचे वेळापत्रक पुढे ढकलून आपली सत्ता टिकवून ठेवू इच्छितात. याच विचाराने ते आपले आंदोलन सुरूठेवत आहेत. त्यांच्याकडे काही यूट्यूबर आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर येऊन भडकवणारे लोक आहेत, ज्यांना सतत लोकांना चिथावणी देण्यास सांगितले जात आहे. याव्यतिरिक्त, त्यांच्याकडे हिज्ब उत-तहरीर आणि जमात-ए-इस्लामीचे विद्यार्थी संघटना शिबिर यांसारखे काही अतिरेकी राजकीय पक्षही आहेत. त्यामुळे ते देशात सामाजिक अस्थिरता निर्माण करण्यासाठी या संसाधनांचा सतत वापर करत आहेत.

**संपूर्ण देशात भारतविरोधी भावना नाही...**

(पान ४ वर...☞)

# दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार... मुहुर्तही ठरला; राजकारणाचे वारे फिरणार...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहराच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची चिन्हे आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) हे दोन्ही पक्ष महापालिका निवडणुकीसाठी एकत्र लढणार असल्याची माहिती अजित पवार गटाचे शहराध्यक्ष सुभाष जगताप यांनी दिली. मात्र, या युतीला शरद पवार गटाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी विरोध दर्शवत राजीनामा दिल्याचे कळते आहे.

**२५ किंवा २६ डिसेंबरला आघाडीची अधिकृत घोषणा**

सुभाष जगताप यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले की, दोन्ही गटांच्या वरिष्ठ नेत्यांची रात्री महत्त्वाची बैठक पार पडली. यामध्ये सामंजस्याने आणि एकमेकांच्या मदतीने निवडणूक लढवण्यावर चर्चा झाली. यापुढची चर्चा शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अंकुश काकडे आणि वंदना चव्हाण यांच्यासोबत होईल असे सुभाष जगताप यांनी सांगितले. जागावाटपाबाबत दोन्ही पक्ष दोन पावले मागे सरकण्यास तयार असून, २५ ते २६ डिसेंबरपर्यंत याबाबतची अधिकृत घोषणा केली जाईल. विशेष म्हणजे, चिन्हासंदर्भात दोन्ही पक्षांनी



कोणताही ताठरपणा न दाखवण्याचे ठरवले आहे असे जगताप यांनी म्हटले.

**जगताप विरूद्ध जगताप**

यावेळी सुभाष जगताप यांनी प्रशांत जगताप यांच्या भूमिकेवर टीका केली. ‘प्रशांत जगताप यांनी राजीनामा दिल्याचे मला समजतेय. एकेकाळी महापालिकेच्या सभेत ‘माझी छाती फाडली तर अजितदादा दिसतील’ असे म्हणणारे जगताप आता दादांच्या विरोधात कशी काय भूमिका घेऊ शकतात? हे त्यांच्या स्वार्थी राजकारणाचे लक्षण आहे,‘ असे जगताप यांनी म्हटले. अजित पवारांनी त्यांना पहिल्याच टर्ममध्ये निवडून आले असतानाही महापौरपद दिले , तरी ते अशी भूमिका का घेत आहेत, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

# हिंदूंनी किमान ३ किंवा ४ मुले जन्माला घालावीत

## नवनीत राणा यांचे अजब आवाहन...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** भाजप नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा या नेहमीच त्यांच्या आक्रमक वक्तव्यामुळे चर्चेत असतात. आता पुन्हा एकदा त्यांनी एका वादग्रस्त विधान केले आहे. एका मुस्लिम मौलानाने केलेल्या वक्तव्याचा दाखला देत नवनीत राणा यांनी हिंदू कुटुंबातील मुलांच्या संख्येबाबत त्यांचे मत मांडले आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

अमरावती प्रसार माध्यमांशी संवाद साधताना नवनीत राणा म्हणाल्या, मौलाना सय्यद कादरी यांनी त्यांना ४ बायका आणि १९ मुले असल्याचं म्हटलं आहे. त्यांचा हिंदुस्थानाला पाकिस्तान बनवण्याचा आहे. ते लोक मोठ्या संख्येने मुले जन्माला घालत आहे. तर मग हिंदूंनी एका मुलावर



संतुष्ट का व्हावे? त्यामुळे हिंदूंनी आता किमान चार मुले जन्माला घातली पाहिजे, असे अजब आवाहन नवनीत राणा यांनी केले आहे. त्यांच्या या वक्तव्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. नवनीत राणा यांनी शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि मनसेच्या युतीबाबतही भाष्य केले आहे. मजबुरीचे नाव जनाब उद्धव ठाकरे झाले आहे. नगरपरिषद नगरपंचायतच्या निवडणुकीमध्ये ते त्यांच्या कार्यकर्त्यासाठी बाहेर निघाले नाहीत, त्यांच्यासोबत कोणीही आले तरी, त्यांची परिस्थिती तशीच राहणार आहे. त्यांच्यासाठी नगरपरिषद नगरपंचायतच्या निवडणुकीपेक्षा वाईट निकाल मुंबईमध्ये लागणार आहेत. तसेच मुंबईत महापालिकेवर महायुतीचा झेंडा फडकेल, अशी अपेक्षाही नवनीत राणा यांनी व्यक्त केली.

**पवार कुटुंबीयांच्या एकत्र येण्यावर भाष्य**

राजकीय विषयावर बोलताना नवनीत राणा यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीवर आणि शरद पवार यांच्यावरही मत व्यक्त केले आहे. नवनीत राणा म्हणाल्या, शरद पवार हे महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते आहेत आणि अजित पवार यांच्यासह पूर्ण पवार कुटुंब हा त्यांचा वैयक्तिक परिवार आहे. अजित पवार यांनी आधीच स्पष्ट केले होते की, भाजपसोबत जाण्याचा सल्ला त्यांना शरद पवार यांनीच दिला होता. त्यामुळे जर दोन्ही पवार पुन्हा एकत्र येत असतील, तर ही चांगलीच गोष्ट

(पान ३ वर...☞)

# भारताने पाकमध्ये घुसून दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले तर गैर काय?

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** पाकिस्तानात शाहबाज शरीफ यांच्या नेतृत्वात सरकार आणि असीम मुनीर यांच्या नेतृत्वात लष्कर आहे. मात्र या सरकारला त्यांच्याच देशातले नेते आरसा दाखवत आहेत. जमीयत उलेमा ए इस्लाम (जेयूआयएफ) चे प्रमुख मौलाना फजलुर रहमान यांनी कराचीतल्या ल्यारीतून शाहबाज आणि मुनीर सरकारला सवाल केला आहे.

पाकिस्तानने कसा दुतोंडीपणा केला ते रहमान यांनी सांगितलं आहे. पाकिस्तानची दुटप्पी भूमिका कायमच उघड झाली आहे. आता त्यांच्या देशातले नेतेही त्यांना आरसा दाखवू लागले आहेत.

**काय म्हणाले रहमान?**

मौलाना रहमान म्हणाले, जर पाकिस्तानने अफगाणिस्तावर, काबूलवर हल्ला करणं हे योग्य आहे तर मग भारताने पाकिस्तानात घुसून दहशतवाद्यांना ठार करण्यात चुकीचं काय? भारताने दहशतवाद्यांना पाकिस्तानात घुसून मारलं त्यात काहीही गैर नाही. असं मत मांडत रहमान यांनी त्यांच्याच देशाला घरचा आहेर दिला आहे.

**२२ डिसेंबरला ल्यारी या ठिकाणी पार पडली परिषद**



**पाकिस्तानचे मौलाना रहमान यांचा सवाल...**

२२ डिसेंबरला ल्यारी या ठिकाणी मजलिस इत्तेहाद-ए- उम्मत पाकिस्तान मध्ये धार्मिक संघटनांची एक सभा बोलवण्यात आली होती. त्यावेळी मौलाना फजलुर रहमान यांनी त्यांचे विचार मांडले. ते म्हणाले की तुम्ही (पाकिस्तान सरकार) म्हणत असाल की अफगाणिस्तानवर हल्ला केला म्हणजेच आपल्या शत्रुराष्ट्रवार हल्ला केला. तुमची ही भूमिका स्पष्ट असेल तर मग भारताने जे केलं त्यात गैर काय? भारताने उद्या तुम्हाला सांगितलं की त्यांनी बहावलपूर आणि मुरीदके मध्ये हल्ला केला आणि काश्मीरमध्ये जो हल्ला तुम्ही केला त्याचा बदला घेतला आहे तर मग भारताच्या या कारवाईवर तुम्हाला आक्षेप का आहे? अफगाणिस्तानबाबत पाकिस्तानने जे धोरण स्वीकारलं आहे त्या धोरणावर मौलाना रहमान यांनी कडाडून टीका केली. ऑक्टोबर महिन्यात दोन्ही देशांमध्ये तणाव निर्माण झाला. या दरम्यान जमीयत उलेमा ए इस्लामच्या प्रमुखांनी पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात तणाव कमी करण्यासाठी प्रयत्न केले. मात्र त्याचा फारसा उपयोग झाला नाही.

**मे महिन्यात राबवण्यात आलं होतं ऑपरेशन सिंदूर**

पहलगाम या ठिकाणी पाकिस्तानी दहशतवाद्यांनी २६ निरपराध पर्यटकांवर एप्रिल महिन्यांत धर्म विचारुन गोळ्या झाडल्या होत्या. त्यानंतर भारताने पाकिस्तनताला त्यांच्याच शब्दांत उत्तर देत ऑपरेशन सिंदूर राबवलं. या ऑपरेशनमध्ये भारताने पाकिस्तानात घुसून कारवाई केली होती. ज्यानंतर पाकिस्तानचा तिळपापड झाला होता. त्यांनी भारतावर ड्रोन हल्ले केले होते. पण पाकिस्तानला भारताने चोख प्रत्युत्तर दिलं होतं.

**तापमान**

दिवस : 28° उच्च
रात्र : 10° किमान

सूर्योदय : ११ तास ०१ मिनिटे
उगवणे : 07:03AM
मावळणे : 06:04 PM
सूर्यास्त : ११ तास ३८ मिनिटे
उगवणे : 10:15PM
मावळणे : 09:53PM

**LIVE**

24k सोने प्रति १० ग्रॅम
रू.१,३८,५५०/-
22k सोने प्रति १० ग्रॅम
रू. १,२७,०००/-

चांदी प्रति किलो
रू. २,२३,०००/-
डॉलर प्रति दर
रू.९०.४४
पेट्रोल : रू. १०३.५०/-
डिझेल : रू. ९०.०३/-



# भारतीय दलित पँथर द्वारा मोबाईल टॉवर हटविण्याची मागणी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
अमरावती - प्रतिनिधी
संजय सरवटकर



**अमरावती :** स्थानिक शेगाव गावठाण येथे उभारण्यात येत असलेल्या एअरटेलचा टॉवर मुळे परिसरातील जनतेला भविष्यात धोका निर्माण होण्याची श्यकता नाकारता येत नसून तो टॉवर तेथून लवकर हटवावा व सामान्य लोकांच्या जीवनाचा खेळ थांबवावा कारण या टॉवर पासून आरोग्यास धोका होण्याची शक्यता असल्यामुळे हा टॉवर तात्काळ हटविण्यात यावा या बाबतचे निवेदन जिल्हाधिकारी यांना भारतीय दलित पँथर चे जिल्हाध्यक्ष प्रवीण पाटील व त्यांच्या सहकार्यांनी नुकतेच दिले असून या टॉवर मुळे होणारे नुकसान याचा उल्लेखही या निवेदनात केला आहे.

**पँथर प्रवीण पाटील यांची जिल्हा धिकारी कार्यालयात धडक**

या टॉवर संदर्भात या अगोदरही तक्रारीचे निवेदव संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले होते परंतु याची कुठलीही दखल घेण्यात आली नाही. या अधिकाऱ्यांची कुंभकर्णी झोप आतातरी उघडते काय याकडे सर्वांचे लक्ष लागले असून ही समस्या लवकर सुटली नाही तर आंदोलन करण्यात येईल असल्याचे सांगण्यात आले. हे निवेदन देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात प्रवीण पाटील सह मनोज धुळेकर, रामटेके,केशव गायकवाड, शिवराम गायकवाड, प्रशांत रामटेके, सचिन मेश्राम, रवि शेंडे,राजू शेंडे इत्यादी उपस्थित होते.

# ५ वर्षांचा अन्याय! रिसोड-घोणसर रस्त्याची दुरावस्था

## गावकऱ्यांचा लोकशाहीवरील विश्वास डळमळीत

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
रिसोड - प्रतिनिधी
विजय जुंजारे



**रिसोड :** रिसोड ते घोणसर हा अवघ्या काही किलोमीटरचा रस्ता गेली १५ वर्षांपासून मृत्यूच्या वाटेवर उभा आहे. निवडणूक आली की लोकप्रतिनिधी गावात येतात, मोठमोठी आश्वासने देतात आणि निघून जातात; मात्र निवडणूक संपताच हा रस्ता आणि येथील ग्रामस्थ पुन्हा विस्मरणात जातात, अशी तीव्र भावना आज घोणसर व परिसरातील नागरिक व्यक्त करत आहेत.

या रस्त्याची अवस्था इतकी भयावह आहे की मोटारसायकल तर दूरच, सायकल चालवणेसुद्धा कठीण झाले आहे. गेल्या १५ वर्षांपासून शाळकरी मुला-मुलींना या रस्त्याने ये-जा करताना प्रचंड हाल सहन करावे लागत आहेत. पावसाळ्यात तर हा रस्ता चिखलाचे तळे बनतो; शिक्षणासाठी रोज रिसोडला जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे भविष्य या रस्त्यामुळे अडथळ्यात सापडले आहे.

**वृद्ध, महिला आणि गर्भवतींची परवड**

या रस्त्यामुळे वृद्ध महिला, ज्येष्ठ नागरिकांना कंबरदुखी व शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, रस्त्यातच महिलांच्या डिलिव्हरी झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. रुग्णवाहिका, आरोग्यसेवा वेळेत पोहोचणे अवघड बनले आहे.

**महत्त्वाची ठिकाणे असूनही दुर्लक्ष**

या मार्गावर गॅस एजन्सीचे गोदाम आहे, तसेच रिसोड नगरपालिकेचे डम्पिंग ग्राउंड याच रस्त्यावर आहे. एवढ्या महत्त्वाच्या सुविधा असूनही प्रशासन आणि लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष का, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

**निवडणूक आली की आठवण, नंतर विसर**

जिल्हा परिषद असो वा पंचायत समितीची निवडणूक दरवेळी गावकऱ्यांना आश्वासनांची पेरणी केली जाते. आमदार-खासदारांना अनेक वेळा निवेदने, आंदोलने करूनही रस्त्याचे काम होत नाही. आंदोलने करताना पोलीसांकडून हुलकावणी दिल्याची तक्रारही ग्रामस्थांनी केली आहे.

**समाजजीवनावर परिणाम**

गेल्या १५ वर्षांपासून रस्ता नसल्याने येथील तरुणांना लग्नासाठी मुलगी देण्यास कोणी तयार होत नाही, अशी विदारक परिस्थिती आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्याच्या दृष्टीने गाव मागे पडत चालले आहे.

**जबाबदार कोण**

विशेष म्हणजे हे गाव माजी आमदार विजयराव जाधव यांचे मूळ गाव असतानाही परिस्थिती जैसे-थे आहे. रिसोड तालुक्याला अनेक दिग्गज नेते लाभले, तरी या रस्त्याला न्याय का मिळत नाही?

आज प्रश्न केवळ रस्त्याचा नाही; लोकशाहीवरचा विश्वास उडण्याचा आहे. न्याय मागायचा तरी कुणाकडे? असा थेट सवाल घोणसरवासीय करत आहेत.

गेल्या १५ वर्षांच्या दुर्लक्षाला जबाबदार कोण?

हा रस्ता कधी होणार, की आश्वासनांचीच वाहतूक सुरू राहणार?

हा प्रश्न आज संपूर्ण परिसरातील जनतेसमोर उभा आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने गडचिरोलीत विद्यार्थ्यांसाठी जिल्हाभर नेत्र तपासणी व मोफत चष्मेवाटप उपक्रम

✼ जिल्हाधिकारी कार्यालय व रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्टमध्ये सामंजस्य करार

✼ एसिलोर लक्सॉटिका फाउंडेशनचे तांत्रिक व कार्यान्वयन सहकार्य

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
गडचिरोली - प्रतिनिधी

**गडचिरोली :** जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ करून त्यांच्या शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्याच्या उद्देशाने, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने गडचिरोली जिल्हा प्रशासन व रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई, यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. या कराराअंतर्गत गडचिरोली जिल्ह्यातील इयत्ता ५ वी ते १० वी मधील सर्व विद्यार्थ्यांसाठी नेत्र तपासणी व मोफत चष्मेवाटप उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाला एसिलोर लक्सॉटिका फाउंडेशनचे तांत्रिक व कार्यान्वयन सहकार्य लाभणार आहे. 'सर्वांसाठी दृष्टी : जिल्हास्तरीय माध्यमिक शाळा नेत्र तपासणी व चष्मेवाटप कार्यक्रम' असे या उपक्रमाचे नाव असून, विद्यार्थ्यांमध्ये आढळणाऱ्या दृष्टीतील अपवर्तन दोषांची वेळेत ओळख करून त्यावर तात्काळ



उपाययोजना करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. दृष्टीदोष ही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम करणारी, मात्र सहज दुरुस्त करता येणारी समस्या असल्याने हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

**जिल्हाभर सर्वसमावेशक अंमलबजावणी**

सामंजस्य करारानुसार गडचिरोली जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची नियोजनबद्ध नेत्र तपासणी करण्यात येणार आहे. ही तपासणी जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाने शासकीय तसेच जिल्हा रुग्णालयातील प्रशिक्षित नेत्र तपासणी तज्ज्ञांच्या माध्यमातून होणार आहे. तपासणीदरम्यान दृष्टीदोष आढळलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार खास तयार केलेले चष्मे मोफत वितरित करण्यात येणार आहेत.

हा उपक्रम पूर्णतः सेवाभावी स्वरूपाचा असून त्यासाठी आवश्यक १०० टक्के निधी स्वयंसेवी संस्थांमार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. चष्म्यांच्या चौकटी, काचा, निर्मिती, पॅकिंग व वितरणाचा संपूर्ण खर्च रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट करणार आहे. एसिलोर लक्सॉटिका फाउंडेशन या उपक्रमासाठी तांत्रिक मार्गदर्शन, गुणवत्ता नियंत्रण व कार्यान्वयन सहकार्य देणार असून, जिल्हा प्रशासनामार्फत आवश्यक पायाभूत सुविधा, मनुष्यबळ व प्रशासकीय समन्वय उपलब्ध करून दिला जाणार आहे. या कराराअंतर्गत कोणताही जिल्हा प्रशासनावर कोणताही आर्थिक भार असणार नाही.

**शैक्षणिक समतेसाठी आदर्श भागीदारी**

विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या महत्त्वाच्या टप्प्यावर दृष्टीसंबंधी अडचणी दूर करून त्यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये, हा या उपक्रमाचा केंद्रबिंदू आहे. मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य व शिक्षण यांचा समन्वय साधणारा हा उपक्रम सार्वजनिक प्रशासन व सेवाभावी संस्थांमधील आदर्श भागीदारीचे उदाहरण ठरणार असून, इतर जिल्ह्यांसाठीही मार्गदर्शक ठरेल.

# रिसोड-मांडवा-मोहजाबंदी रस्त्याची अक्षरशः चाळणी, नागरिकांमध्ये तीव्र संताप

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वाशिम/रिसोड - प्रतिनिधी
भागवत घुगे



**रिसोड :** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निकृष्ट कामकाजामुळे रिसोड ते भर, कु-हा, मांडवा, मोहजाबंदी या महत्त्वाच्या रस्त्याची दुरवस्था झाली असून नागरिकांमध्ये तीव्र रोष व्यक्त होत आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये लाखो रुपयांचा निधी खर्च करून तयार करण्यात आलेला भर ते मोहजाबंदी हा रस्ता अवघ्या एका वर्षात अक्षरशः उघडला आहे. ठिकठिकाणी डांबर निघून गेले असून मोठमोठे खड्डे पडले आहेत. रस्त्यावर गिट्टी साचल्याने वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

हा रस्ता मराठवाडा-विदर्भाला जोडणारा प्रमुख मार्ग असून दररोज अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. मात्र एका पावसाळ्यानंतर आणि उन्हाळा संपताच हा रस्ता पूर्णतः खराब झाला आहे, यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामाच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

रस्त्यावरील खड्डे, सैल गिट्टी आणि धुळीमुळे अपघातांचा धोका वाढला असून अनेक वाहनांचे नुकसान होत आहे. शाळकरी विद्यार्थी, महिला, वृद्ध नागरिक तसेच रुग्णवाहिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वाहतुकीची कोंडी ही नित्याची बाब बनली आहे. या गंभीर परिस्थितीकडे प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन रस्त्याची दुरुस्ती करावी, दोषी ठेकेदारांवर कारवाई करावी आणि कामाच्या दर्जाची चौकशी करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# प्रस्तावित वाढवण बंदर प्रकल्प

## मच्छीमार सर्वेक्षणावर जिल्हाधिकारी अध्यक्षतेखाली बैठक



### सामाजिक, आर्थिक व उपजीविकेच्या दृष्टीने मच्छीमारांचे सर्वेक्षण अत्यावश्यक - जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
पालघर - प्रतिनिधी
मिलिंद चुरी

**पालघर :** प्रस्तावित वाढवण बंदर प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर परिसरातील मच्छीमारांचे सामाजिक, आर्थिक व उपजीविकेच्या दृष्टीने सर्वेक्षण करण्याची गरज अत्यंत महत्वाची असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी अधोरेखित केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत सर्वेक्षणाचे महत्त्व, त्याची आवश्यकता आणि धोरण यावर सविस्तर चर्चा झाली. बैठकीत पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, उपजिल्हाधिकारी तेजस चव्हाण, महेश सागर, जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटीचे सल्लागार राजीव सिन्हा, सहाय्यक आयुक्त (मत्स्यव्यवसाय) ठाणे-पालघर आणि विविध संबंधित विभागांचे अधिकारी तसेच बाधित क्षेत्रातील मच्छीमार संस्था व संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड म्हणाल्या की, मच्छीमारांचे वास्तव स्थितीचे अचूक सर्वेक्षण करणे, त्यांच्या हक्कांचे रक्षण करणे, त्यांच्या उपजीविकेवर होणारा परिणाम समजून घेणे आणि भविष्यातील धोरणात्मक निर्णयांसाठी ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे.

बैठकीत संबंधित विभागांचे अधिकारी व मच्छीमार संघटनांचे प्रतिनिधींनी सर्वेक्षण कसे करावे, धोरण काय असावे यावर सखोल चर्चा केली. जवाहरलाल नेहरूपोर्ट ऑथॉरिटीचे अधिकारी यांनी प्राथमिक सर्वेक्षणाची रूपरेषा व प्रक्रियेबाबत माहिती दिली.

बाधित क्षेत्रातील मच्छीमार संस्था व संघटनांच्या प्रतिनिधींनी या बैठकीत सांगितले की, सध्या बाधित होणाऱ्या १६ गावांचे सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रस्तावित वाढवण बंदर परिसरातील इतर मच्छीमारांचेही सर्वेक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच, JNPA मार्फत केले जाणारे सर्वेक्षण काम पूर्ण सहकार्याने करण्याची तयारी त्यांनी व्यक्त केली.

# आचारसंहितेत दारू माफियांवर घणाघात

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची वाशिममध्ये धडक कारवाई

## १.९१ लाखांचा मुद्देमाल नष्ट, एक अटक

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वाशिम - प्रतिनिधी
प्रताप नागरे



**वाशिम :** स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करत राज्य उत्पादन शुल्क विभाग अवैध दारू माफियांवर धडक कारवाईचा बडगा उगारत आहे. त्याच अनुषंगाने २३ डिसेंबर रोजी वाशिम जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत हातभट्टी निर्मितीचे समूळ उच्चाटन करत कायद्याची ठोस अंमलबजावणी केली.

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अमरावती विभाग येथील विभागीय उप आयुक्त डॉ. पराग नवलकर यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई यशस्वीरीत्या पार पडली. वाशिम तालुक्यातील मौजे मोहगव्हाण व सुरकुंडी (शेतशिवार परिसर) येथे भरारी पथकाने एकत्रित छापे टाकत अवैध हातभट्टी दारूच्या साखळीला जबर धक्का दिला.

या कारवाईत एकूण ६ गुन्हे दाखल करण्यात आले असून १ आरोपीस अटक करण्यात आली आहे. पथकाने सुमारे ६० लिटर गावठी दारू, दारू गाळण्यासाठी वापरण्यात येणारा ४,८७५ लिटर मोहासडवा (रसायन) तसेच हातभट्टीसाठी लागणारे साहित्य जप्त केले. जप्त मुद्देमालाची अंदाजे किंमत १,९१,९०० रुपये इतकी असून सर्व साहित्य नियमानुसार नष्ट करण्यात आले आहे.

निवडणूक कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे, मतदारांवर परिणाम करणाऱ्या बेकायदेशीर कृतींना आळा घालणे आणि आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्यांना कठोर संदेश देणे्हा या कारवाईचा स्पष्ट उद्देश आहे. प्रशासनाने ठाम शब्दांत इशारा देत अशा कारवाया पुढेही अखंडित व अधिक तीव्र राहणार असल्याचे जाहीर केले आहे. या मोहिमेत विभागीय उप आयुक्त डॉ. पराग नवलकर, प्रभारी निरीक्षक अनंतकुमार खांदवे, निरीक्षक एम. के. उईके, दुय्यम निरीक्षक राजरतन मनवर, एम. एस. जाधव, अश्विनी उबाळे, सुरेश चव्हाण तसेच त्यांच्या अधिपत्याखालील जवानांनी सक्रिय सहभाग नोंदवून कारवाईला धार दिली. दरम्यान, अवैध दारू विक्री, हातभट्टी निर्मिती किंवा वाहतुकीबाबत माहिती असल्यास नागरिकांनी टोल फ्री १८०० ०८३ ३३३३, व्हॉट्सअॅप ८४२२००११३३ किंवा Excise Suvidha Portal वर तक्रार नोंदवावी, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाने केले आहे.

# शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सविता पवार

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मोहोळ - प्रतिनिधी
राज खरात



**मोहोळ :** जि. प. प्रा. शाळा, पवार वस्ती (वडवळ) येथे शाळा व्यवस्थापन समितीची पुनर्रचना करण्यासाठी सर्व माता पालकांची सभा आयोजित करण्यात आली होती. या पालकसभेत शाळा व्यवस्थापन परिषदेच्या अध्यक्षपदी सर्वानुमते सविता पवार आणि उपाध्यक्षपदी रेश्मा अदमाने यांची निवड करण्यात आली. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका खूप महत्त्वाची असते. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत तसेच त्यांच्या व्यक्तिमत्व सुधारणेमध्ये मातापालकांचे मोठे योगदान असते. त्यामुळे शाळा व्यवस्थापनाची धुरा यंदा महिलांच्या हाती सोपविण्यात यावी असे मत सर्व उपस्थितांनी मांडले. या निवडी प्रसंगी हरिदास पवार, भारत अदमाने, शहाजी गुंड, कैलास गावडे, धनाजी काळे, सोनाली पवार, अश्विनी पवार, शिक्षिका वैशाली जाधव, मंजू बनसोडे आणि बहुसंख्य माता पालक उपस्थित होते. उपस्थितांचे आभार मुख्याध्यापक लक्ष्मण गोफणे यांनी मानले.



# गडचिरोलीतील नवजात बालकांच्या जीवाशी खेळ...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
गडचिरोली - प्रतिनिधी
विजय शेडमाके

## दीड महिन्यापासून 'रोटा' लस गायब – पालकांमध्ये भीतीचे




**गडचिरोली :** अत्यंत दुर्गम, आदिवासी व सवेनशील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यात राज्य सरकारच्या आरोग्य व्यवस्थेची भीषण वास्तवता पुन्हा एकदा समोर आली आहे. जिल्ह्यातील शासकीय रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये गेल्या एक ते दीड महिन्यापासून नवजात बालकांसाठी अत्यावश्यक असलेली, 'रोटा' लस पूर्णतः अनुपलब्ध असल्याने जिल्हाभर खडबड उडाली आहे. या गंभीर प्रकारामुळे नवजात बालकांचे पालक प्रचंड चिंतेत असून बालकांच्या आरोग्यावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडी यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. त्यांनी म्हटले आहे की राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री असतानाही जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेची अशी दैनिक अवस्था असणे अत्यंत लज्जास्पद आहे. मुख्यमंत्र्यांना निवडणूक प्रचार, राजकीय सभा व भाषणासाठी वेळ आहे मात्र आदिवासी ग्रामीण व अतिदुर्गम भागातील नागरिकांच्या मूलभूत आरोग्य समस्या कडे दुर्लक्ष होत आहे हे दुर्दैवी आहे.

जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, आणि प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये औषधांच्या मोठ्या प्रमाणावर तुटवडा असून वैद्यकीय साधनसामग्री अपुरी आहे. अनेक ठिकाणी रुग्णवाहिका नादुरुस्त अवस्थेत असून त्या वापरणे योग्य नाहीत, जिल्हा रुग्णालयात अध्ययवत वैद्यकीय सुविधा असल्याचे केवळ कागदावर दिसून येत असून, प्रत्यक्षात रुग्णांना त्याच्या लाभ मिळत नसल्याच्या आरोपही त्यांनी केला. राज्य सरकार गडचिरोली जिल्ह्याला 'स्टील हब' बनवण्याच्या घोषणा करत असेल तरी जिल्ह्यातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य सेवा पुरवण्यात सरकार पूर्ण अपयशी ठरत आहे. असा घनघाती आरोप काँग्रेसने केला आहे. अहेरी येथे मंजूर झालेले डायलेसिस केंद्र अद्याप कार्यान्वित न झाल्याने सिरोंच्या भामरागड सारख्या अतिदुर्गम भागातील रुग्णांना गडचिरोली किंवा चंद्रपूर येथे जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. राज्य सरकारने या गंभीर परिस्थिती तात्काळ जबाबदारी स्वीकारून 'रोटा 'लसीच्या त्वरित पुरवठा करावा जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सक्षम करावी आणि नवज्योत बालकांच्या जीवाशी सुरूवातीला खेळ तात्काळ थांबवावा अन्यथा काँग्रेस पक्ष गडचिरोली जिल्ह्यातील आंदोलन शेड्युल असा इशारा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे यांनी दिला आहे.

# डुकरांच्या हैदोसाने वहीतदार शेतकऱ्यांचे तूरपीक उद्ध्वस्त

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वर्धा - उपसंपादक
अवधूत शेंद्रे



**वर्धा - आष्टी :** तालुक्यातील धाडी येथील रहिवासी शेतकरी वसीम खा पठाण यांनी मौजा ईसापूर शिवारातील गजानन भलावी यांचे ३ एकर शेत मकत्याने केले त्यात कापूस, तूर पीक पेरले त्यातील तूर पीक सोकारी जावून डुलकी लागल्याच्या वेळेस उभ्या असलेल्या तूरपिकावर जंगली डुकरांनी हल्ला चढवत मोठ्या प्रमाणात नुकसान केले. रात्रीच्या सुमारास डुकरांचा कळप शेतात शिरला आणि काही तासांतच एकरभर तूरपीक फस्त केले. काढणीच्या तोंडावरच पीक नष्ट झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहेत. तूरपिकासाठी बियाणे, खत, औषधे व मजुरीवर मोठा खर्च झालेला असतानाच हा फटका बसल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या भागात डुकरांच्या उपद्रवाच्या घटना वारंवार घडत असल्या तरी अद्याप ठोस प्रतिबंधक उपाययोजना झालेल्या नाहीत, अशी तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. घटनेनंतर संबंधित विभागाकडे पंचनामा करून तात्काळ नुकसानभरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. तसेच वनविभागाने गस्त वाढवून कुंपण, सौर कुंपण व इतर उपाययोजना त्वरित राबवाव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

# उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना महापालिका निवडणुक हिम्मतीने लढेल व जिकेलं – बबनराव थोरात

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नांदेड - प्रतिनिधी
शिलरतन लोखंडे



**नांदेड :** पक्षफुटीनंतरही शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी दाखविलेल्या निष्ठा मेहनत व जनसंपर्कामुळे सामान्य जनता पुन्हा एकदा शिवसेने सोबत ठामपने उभी राहिली आहे. यांच्या प्रत्यय नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकातून स्पष्टपणे आला आहे असे प्रतिपादन शिवसेना (उबाटा) पक्षाचे उपनेते व संपर्क प्रमुख बबनराव थोरात यांनी केले. नांदेड येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. थोरात यांनी सांगितले की, या निवडणुकामध्ये शिवसेनेचे एक नगराध्यक्ष पद १४ एकूण १८ जागावर विजय मिळवला असून हा विजय शिवसेनिकांच्या जिद्द, मेहनत व जनतेच्या विश्वासाचे प्रतिक आहे.

यावेळी लातूरचे संपर्क प्रमुख रोहिदास चव्हाण, जिल्हा प्रमुख भुजंग पाटील, महानगर प्रमुख प्रकाश मारावार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते. महापालिका निवडणूकीच्या तयारी बाबत माहिती देतांना थोरात म्हणाले की, अपेक्षेपेक्षा अधिक उत्साह दिसून येत असून २० प्रभागातील ८१ जागासांठी सुमारे १५० इच्छुक उमेदवारांनी मुलाखती दिल्या आहेत. यावरून पक्षाची ताकद व जनाधार वाढत असल्याचे स्पष्ट होते.

## २० प्रभागातील ८१ जागासाठी सुमारे १५० उमेदवाराने मुलाखती दिल्या

महाविकास आघाडीतील घटक पक्षाशी जागावाटपा बाबत सकारात्मक चर्चा सुरु असून शिवसेनेला सन्मानकारक जागा न मिळाल्यास पक्ष स्वबळावर महापालिका निवडणूक लढवण्यास पूर्णतः सज्ज आहे. असा ठाम विश्वास थोरात यांनी व्यक्त केला. शिंदे गटाला अपेक्षित यश मिळाले नसल्याचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात झालेली विकासकामे आजही जनतेसमोर आहेत. त्यामुळे जनतेने शिवसेनेला पुन्हा एकदा सेवा करण्याची संधी द्यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# गावरान बोरांचा आंबट-गोडपणा झाला दुर्मिळ

## आता नवीन वाणांना शेतकऱ्यांची पसंती

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
देगलूर - प्रतिनिधी
संतोष मंनधरणे



**देगलूर :** थंडी सुरू झाली की जीभेवर हमखास रेंगाळणाऱ्या आंबट-गोड गावरान बोरांचा स्वाद आता दुर्मिळ झाला आहे. शेतातील बांधावर असणाऱ्या गावरान बोरांच्या झाडांची संख्याच घटली आहे. त्यामुळे अशी बोरं विक्रीस येण्याचे प्रमाणही घटले आहे. आता नवीन वाणांच्या बोरांना शेतकरी प्राधान्य देतात. त्यामुळे हीच बोरं मोठ्या प्रमाणावर विक्रीस येतात.

एकेकाळी शेताच्या बांधावर, ओढ्या-नाल्यांमध्ये, रस्त्याच्या बाजूला मोठ्या प्रमाणावर बोरांची झाडे असायची. त्यामुळे कुठेही अगदी सहज गावरान बोरं खाण्यास मिळायची. काही बोरात आंबट-गोडपणा, काही अगदीच आंबटजाळ, काही पिठाळ, खारकी बोरांची तर बातचं न्यारीच असायची.

नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी असे तीन महिने बोरांचा सिझन असतो. बोरं घरी खाण्यासाठी ठेऊन शेतकरी बाजारात विक्रीसाठी घेऊन जात असत. त्यामुळे गावरान बोरं विक्रीस येत असत. शेतात होऊ लागलेल्या बदलानुसार तसेच भावा भावात शेताच्या वाटण्या झाल्यावर क्षेत्र कमी होऊ लागले. त्यामुळे शेतकरी शेतातील पिकावर पडणाऱ्या वसव्यामुळे (सावली) बांधावरील झाडे काढून टाकू लागले. त्यातही मशागती करताना बोरीचा काटा टोकदार असल्याने त्याचा त्रास अधिक होतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी आंबा, जांभूळ, नारळ आदी फळझाडांच्या तुलनेत बांधावरील बोरीची झाडे काढण्यास प्राधान्य दिले. त्यामुळे आपसूकच गावरान बोराची झाडे अगदीच कमी झाली. ज्या शेतकऱ्यांकडे जास्त क्षेत्र आहे, त्यांनीच गावरान झाडे ठेवली आहेत. याशिवाय ही बोरं किडण्याचे प्रमाणही अधिक आहे. त्यामुळेही झाडाची बरीचशी बोरं किडलेलीच निघतात. त्यामुळेही शेतकऱ्यांनी बोराची झाडे काढून टाकली आहेत. त्यामुळे बाजारात बोरं विक्रीस येण्याचे प्रमाण कमी झाले.

### नवीन वाणांतून मिळतात चांगले पैसे...

अलिकडील काळात शेतकरी संत्रा, जांब, मोसंबीसह इतर फळबागांप्रमाणेच बोरांकडेही उत्पादनाचे पीक म्हणून पाहू लागले आहेत. त्यामुळे शेतकरी नवीन वाणांच्या बोरांची बाग लावू लागले आहेत. त्यातून चांगले पैसेही मिळतात. उमराण, बनारसी, चमेली, अहमदाबादी, चेकमेट, चन्या मन्या, बकुळा, ॲपल अशी बोरांची काही वाण प्रसिद्ध आहेत. यातील काही वाणांना केवळ गोडीच आहे. यात आंबटपणा फारसा आढळत नाही. काही बोरं नुसतीच पिठाळ लागतात. गावरान बोरांसारखा आंबट-गोडपणात यात फारसा नसतो.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेत नविन अर्ज करण्यासाठी ३१ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
उस्माननगर - प्रतिनिधी
लक्ष्मण कांबळे



**नांदेड/उस्माननगर :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील जे विद्यार्थी शासकीय वसतिगृहास प्रवेशास पात्र असुन प्रवेश मिळालेला नाही. अशा विद्यार्थ्यांना मॅट्रीकोतर शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा विद्यार्थ्यांना स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक रक्कम संबंधीत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये थेट वितरीत करण्यात डॉ. बाबासाहेब आबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येत आहे. शासन परिपत्रकानुसार स्वाधार योजने साठी पात्र विद्यार्थ्यास ऑनलाईन अर्ज कण्यासाठी ३० नोव्हेंबर २०२५ ही शेवटची तारीख देण्यात आली होती. मात्र विद्यार्थ्यांना ऑनलाईन नोंदनी करतांना पोर्टलवर वारंवार तांत्रिक अडचनी येत आल्यामुळे व डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची व्याप्ती तालुका स्तरावरापर्यंत वाढविल्यामुळे विद्यार्थाना स्वाधार योजनेचे ऑनलाईन अर्ज भरण्यापासून विद्यार्थी वंचित राहीले होते. या विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करते वेळी पोर्टलवर येणाऱ्या तांत्रिक अडचणीमुळे विहित मुदतीत ऑनलाईन अर्ज करता आले नाही त्या साठी व काही विद्यार्थ्यांचा निकाल उशीरा लागल्याने महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रिया उशीरा सुरू होणारे शैक्षणिक सत्र ई.बाबीचा विचार करून अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये याकरिता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेपासून कोणीही वंचित राहू नये म्हणून विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज स्वीकरण्यासाठी दि.३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वेबसाईट सुरूठेवण्यासाठी सामाजिक न्याय विभागाकडून मुदतवाढ देण्यात आली आहे. आतापर्यंत नांदेड जिल्ह्यातून दि.३० नोव्हेंबर पर्यंत ९ हजार ८९६ स्वाधार साठी अर्ज प्राप्त झाले आहेत. तरी वसतिगृहाचा लाभ न मिळालेल्या पात्र विद्यार्थ्यांनी ३१ डिसेंबर पर्यंत अचूक स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करावेत असे आवाहन शिवानंद मिनगिरे समाजकल्याण सहाय्यक आयुक्त नांदेड यांनी केले आहे.

### आवश्यक कागदपत्रे कोणती?

जातीचे प्रमाणपत्र, २०२५ चा उत्पन्नाचा दाखला, शहरी निवासाचा पुरावा, १० वी १२ वी किंवा मागील वर्षांची गुण पत्रिका, जातीचे प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, चालु आसलेल्या अभ्यासक्रमाचे कॉलेजचे बोनाफाईड प्रमाणपत्र, आधार लिंक आसलेल्या बँक पासबुकची प्रत, शासकीय वस्तीगृहात प्रवेश मीळाला नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र, भाडे कराराणामा, महानगरपालीका क्षेत्रामध्ये असलेली महाविद्यालय तसेच नांदेड महानगरपालिका हद्दीपासून ०५ कि.मी. परिसरात असलेली महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अर्ज करावा. महाविद्यालयातील उपस्थितीती ७५ टक्के पेक्षा जास्त आसणे बंधनकारक आसेल, विद्यार्थ्यांची नि विद्यार्थ्यांच्या गुणवतेच्या आधारावर करण्यात येईल. या योजनेसाठी खासबाब माणून सवलत देण्यात येणार नाही. तसेच या प्रणालीमध्ये आपले महाविद्यालय महानगर पालिके हद्दीपासून ५ कि.मी.च्या आत असल्याबाबत चे स्वयंघोषित प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

# किर्ला येथे दारुड्या टोळक्याकडून कुटुंबावर जीवघेणा हल्ला

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मंठा - प्रतिनिधी
सुरेश ज्ञा. दवणे

## पोलिस अधीक्षकांकडे तक्रार

**जालना (मंठा) :** तालुक्यातील किर्ला गावात दारूच्या नशेत दहशत माजवणाऱ्या एका टोळक्याने एका कुटुंबावर जीवघेणा हल्ला केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या प्रकरणी आशिष अरविंद चव्हाण (वय ४२, रा. किर्ला, ता. मंठा) यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक, जालना यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, अर्जदार आशिष चव्हाण हे नोकरी निमित्त जालना येथे वास्तव्यास असून त्यांच्या गावात आई-वडील, आजी व लहान भाऊ राहतात. गावातील बन्शीलालसिंग राठोड हा इसम दारूच्या नशेत नेहमी त्यांच्या कुटुंबीयांना शिवीगाळ, धमक्या देत त्रास देत असल्याचा आरोप आहे. यापूर्वी गावस्तरावर पंचकमिटीच्या माध्यमातून वाद मिटवण्याचा प्रयत्न करण्यात आला होता; मात्र संबंधित इसमाचे वर्तन कायमस्वरूपी सुधारले नाही.

दिनांक ३ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास बन्शीलालसिंग राठोड हा दारूच्या नशेत चव्हाण यांच्या घरी येऊन 'आशिषला जिवे मारण्याची' धमकी देत कुटुंबीयांवर दहशत निर्माण करू लागला. त्यानंतर बन्शीलालसिंग राठोड, अन्साबाई राठोड, सुशिल राठोड, मिराबाई राठोड, शालुबाई चव्हाण, विनोद चव्हाण, ज्योती चव्हाण आदींनी हातात काठ्या, दगड, चाकू, कुऱ्हाड घेऊन चव्हाण यांच्यावर हल्ला केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात आशिष चव्हाण यांना काठीने मारहाण करण्यात आली, त्यांच्या लहान भावाला लाथा मारण्यात आल्या, तर आई शांताबाई चव्हाण यांना ओढत फरफटत नेण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. प्रसंगी कृष्णा राठोड व अंजली राठोड यांनी मध्यस्थी केल्याने मोठा अनर्थ टळल्याचे सांगण्यात आले आहे.

विशेष म्हणजे याच आरोपींविरुद्ध यापूर्वी मंठा पोलिस ठाण्यात दिनांक १४ मे २०२५ रोजी गुन्हा क्रमांक ०२६३/२०२५ दाखल असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. आरोपी सुशिल राठोड हा वाळू माफिया असल्याचा आणि त्याच्यावर वाळू चोरीचे गुन्हे दाखल असल्याचाही आरोप अर्जात करण्यात आला आहे.

'माझ्या व माझ्या कुटुंबाच्या जिवितास गंभीर धोका निर्माण झाला असून, काही अनुचित घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित आरोपींवर राहील,' असे अर्जदार आशिष चव्हाण यांनी तक्रारीत नमूद केले आहे. आरोपींविरुद्ध तात्काळ कडक कारवाई करून अटक करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी पोलिस अधीक्षकांकडे केली आहे. या घटनेमुळे किर्ला गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिस प्रशासनाची भूमिका काय राहते याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# डिकसळ रेशन दुकानाची पर्याय व्यवस्था कळंबला; नागरिकांची गैरसोय

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
धाराशिव - प्रतिनिधी
समीर मुल्ला

**धाराशिव :** डिकसळ येथील शासकीय रेशन दुकानाची पर्याय व्यवस्था कळंब येथे दिल्यामुळे डिकसळ परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही पर्याय व्यवस्था तात्काळ रद्द करून डिकसळ येथीलच शिधापत्रिका धारकांना गावातच धान्य मिळावे, अशी जोरदार मागणी दयावान प्रतिष्ठान अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य इम्रान मुल्ला, मोबीन मणियार, अभय गायकवाड डिकसळच्या वतीने करण्यात आली आहे. डिकसळ येथील शासकीय रेशन दुकान क्रमांक २ ची पर्याय व्यवस्था कळंब येथील दुकानावर देण्यात आली असून त्यामुळे नागरिकांना लांब अंतर प्रवास करावा लागत आहे. विशेषतः वृद्ध, महिला व गरीब नागरिकांसाठी ही व्यवस्था अत्यंत गैरसोयीची ठरत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच संबंधित रेशन दुकानदाराकडे आधीच तीन पर्याय व्यवस्था असल्यामुळे डिकसळ येथील नागरिकांना वेळेवर धान्य मिळण्यात अडथळे निर्माण होत असून लाभार्थ्यांचे आर्थिक व मानसिक नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर कळंब येथील पर्याय व्यवस्था तात्काळ रद्द करून डिकसळ येथील शिधापत्रिकाधारकांना डिकसळमधीलच योग्य रेशन दुकानावर पर्याय व्यवस्था देण्यात यावी, अशी मागणी तहसीलदार कळंब यांच्याकडे करण्यात आली आहे. प्रशासनाने या विषयावर तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

(पान १ वरून...)

## राहुल गांधींनी जर्मनीत उपस्थित केला...

ज्या हर्टी स्कूलमध्ये बोलले, तेथील प्राध्यापिका कॉर्नेलिया वोल यांचे संबंध अब्जाधीश गुंतवणूकदार जॉर्ज सोरोसशी संबंधित संस्थांशी आहेत. भाजपचा आरोप आहे की, सोरोस भारतात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न करत असून, काँग्रेस त्यांच्याशी अप्रत्यक्षरित्या जोडलेली आहे.

## हिंदूंनी किमान ३ किंवा ४ मुले ...

आहे, असे मत नवनीत राणा यांनी व्यक्त केले. यापूर्वी अमरावतीमधील एका स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक सभेत बोलताना नवनीत राणा यांनी अत्यंत जहाल भाषेत इशारा दिला होता. जो कोणी आपल्या धर्म ध्वजाकडे वाकड्या नजरेने बघेल किंवा बोट उचलेल, त्याची बोटे कापली पाहिजेत, असे त्या म्हणाल्या होत्या.



■ दै.चालु वार्ता वृत्तसेवा

कंधार नगरपरिषदेच्या नगरसेवक पदी निवडून आल्याबद्दल सौ.वैशालीताई बसवंते, दिलीप पवार, दिलीप देशमुख यांचा सत्कार करून भावी कार्याच्या शुभेच्छा देताना, कंधार तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय भोसीकर माजी जि.प.सदस्या तथा नांदेड जिल्हा महिला कॉंग्रेसच्या उपाध्यक्षा सौ.वर्षाताई भोसीकर, युवक कॉंग्रेसचे शहराध्यक्ष अजय मोरे.

छाया – माधव गोटमवाड




# रखडलेली जलजीवन मिशन : सरपंच आक्रमक

■ दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**जव्हार - प्रतिनिधी**
**दिपक काकरा**

**जव्हार :** शासनाची महत्त्वकांक्षी असलेली जलजीवन मिशन योजनेअंतर्गत 'हर घर जल'चा गजर झालेल्या योजनेचे तालुकाभरात अनेक ग्रामपंचायतीमध्ये तब्बल दोन वर्षापासून सुरू केलेली कामे अर्धवट स्थितीत असून अपूर्ण आणि रखडलेली आहेत असा आरोप करत प्रशासनाच्या दिरंगाई विरोधात अखेर जव्हार सरपंच संघटनेचा संताप उफाळून आला. १६ डिसेंबरला गटविकास अधिकारी जव्हार यांना निवेदन देत जलजीवन मिशनचे काम सुरूकरण्यासाठी ७ दिवसांची मुदत प्रशासनाला संघटनेकडून देण्यात आली होती. त्यानुसार जव्हार सरपंच संघटनेने हंडा मोर्चा घेऊन मंगळवारी (दि-२३) पंचायत समिती कार्यालयासमोर ठिय्या मांडत रखडलेल्या कामाबाबत अधिकाऱ्यांना जाब विचारला.



## सरपंच संघटनेचे निवेदन

तालुक्यातील ४८ ग्रामपंचायती आणि २ ग्रामदान मंडळ असे एकूण ५० ग्रामपंचायतीमध्ये जलजीवन मिशन योजनेअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या कामात पाईपलाईन,जलकुंभ, नळ जोडण्याची अर्धवट कामे गेल्या दोन वर्षापासून अर्धवट स्थित असून ही कामे मध्येच बंद पडल्याने स्थानिक ग्रामीण भागातील आदिवासी बांधवांना पिण्याच्या पाण्याचीसाठी होणारी धावपळ व पायपीट वर्षानुवर्ष थांबत नसल्याने सरपंच संघटना रस्त्यावर उतरली. ही राखडलेल्या काम मार्गी लागावी म्हणून सरपंच संघटना शासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून कोणतेही ठोस कारवाई केली जात नसल्याने जलजीवन मिशनचा मुद्दा सरपंच संघटनेला हाती घ्यावा लागला आहे. तालुक्यातील नागरिकांना पाण्यासाठी करावी लागणारी भटकंती थांबविण्यासाठी जलजीवन मिशन ही योजना महत्वपूर्ण मानले जात असल्याने येत्या ३१ मार्च २०२६ पर्यंत रखडलेल्या पाणीपुरवठा योजनेची कामे पूर्ण करून पाणीपुरवठा सुरळीत करून देण्यात यावा अशा आशयाचे पत्र शासनाला जव्हार सरपंच संघटनेकडून देण्यात आले. दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही यावेळेस संघटनेकडून सांगण्यात आला आहे. उन्हाळा तोंडावर असताना प्रशासनाकडून रखडलेल्या नळपाणी योजनेकडे डोळे झाक होत असल्याचा आरोप ही यावेळी आंदोलकांनी केला.

अपूर्ण असलेली पाणीपुरवठा योजना तात्काळ पूर्ण करून निकृष्ट दर्जाची झालेली कामांची चौकशीही करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी ही सरपंच संघटनेने यावेळी प्रशासनाकडे केले आहे. या मोर्चात तालुक्यातील विविध ग्रामपंचायतीचे सरपंच,उपसरपंच महिला व ग्रामस्थांनी पंचायत समिती परिसरात घोषणाबाजी करत जलजीवन मिशनच्या नावाखाली सुरू असलेल्या हलगर्जीपणाला चाप लावणार का, की नागरिकांना अजूनही तहान भागवण्यासाठी ती संघर्ष करावा लागणार असा सवाल ही उपस्थित केला जात आहे. यावेळी गटविकास अधिकाऱ्यांनी सरपंच संघटनेची जनजीवन मिशन अंतर्गत आणि योजना व्यवस्थित सुरूकरण्यात याबाबतचे दिलेले निवेदन हे वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवण्यात येईल आणि संबंधित विभागाला हे काम त्वरित सुरूकरण्यासाठी ३० डिसेंबर पर्यंत पाहणी करून कामे चालू करण्याच्या सूचना केल्याचे सांगितले.

# महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या पुणे जिल्हा कार्याध्यक्षपदी डॉ. तेजस हांगे यांची निवड

■ दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**इंदापूर - प्रतिनिधी**
**बापू बोराटे**

**पुणे (इंदापूर) :** महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या पुणे जिल्हा कार्याध्यक्षपदी जिल्हा परिषदेतील हरहुन्नरी, तरुण आणि कार्यतत्पर सहकारी डॉ. तेजस हांगे यांची अधिकृत निवड करण्यात आली. ही निवड आज पुणे जिल्हा परिषदेमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात राज्याध्यक्ष उमेशचंद्र चुलबुले, पुणे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत जगताप तसेच इतर मान्यवर पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत निवडपत्र प्रदान करून करण्यात आली.



## पशुसंवर्धन विभागाला प्रथमच महासंघात मानाचे पद

या निवडीप्रसंगी डॉ. तेजस हांगे यांचा राज्याध्यक्ष व उपस्थित पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या या निवडीमुळे पुणे जिल्ह्यात प्रथमच पशुसंवर्धन विभागातील पशुधन पर्यवेक्षक संवर्गाला महासंघामध्ये मानाचे पद मिळाल्याने विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या कार्यक्रमास पशुसंवर्धन विभागातून महासंघाचे मुख्यालय सहसचिव डॉ. महेश शेळके, डॉ. अजय मुंडे, डॉ. अमोल क्षीरसागर, डॉ. नवनाथ राठोड हे आवर्जून उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.

डॉ. तेजस हांगे यांना हे पद मिळण्यासाठी राज्याध्यक्ष डॉ. भगवान पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले असून, त्याबद्दल पुणे जिल्हा संघटनेच्या वतीने यावेळी जाहीर आभार व्यक्त करण्यात आले. संघटनात्मक कार्य, कर्मचारी प्रश्नांची जाण आणि तरुण नेतृत्वाची ऊर्जा यामुळे डॉ. हांगे यांची निवड महासंघासाठी निश्चितच लाभदायक ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

डॉ.तेजस हांगे यांनी आपल्या पदाचा उपयोग करून पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद कर्मचारी, विशेषतः पशुसंवर्धन विभागातील कर्मचाऱ्यांच्या समस्या प्रभावीपणे मांडून महासंघाचे नाव उज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. त्यांच्या पुढील संघटनात्मक वाटचालीस उपस्थित सर्व पदाधिकारी व सहकाऱ्यांच्या वतीने मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

# केळव्यात लग्न सोहळ्यानंतर राडा
# लोखंडी शस्त्रांच्या हकल्ल्यात चार जण जखमी

■ दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**पालघर - प्रतिनिधी**
**रवि राठोड**

**पालघर :** केळवा सागरी पोलिस ठाणे हद्दीतील दांडाखाडी येथील मॅंग्रोज रिसॉर्टमध्ये सोमवारी सायंकाळी पार पडलेल्या लग्न सोहळ्यानंतर अचानक हिंसक प्रकार घडला. पाहुण्यांच्या वाहनांच्या ये-जा दरम्यान झालेल्या वादातून दोन जणांनी लोखंडी शस्त्रांनी हल्ला केल्याने चार जण जखमी झाले असून त्यातील काहींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे.

लग्न समारंभासाठी आलेल्या पाहुण्यांच्या परतीसाठी रिसॉर्टकडून वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी एका मारुती इको



वाहनात वयोवृद्ध महिला बसत असताना रस्त्यात अडथळा निर्माण झाला. यावरून झालेल्या वादातून आक्रमक भूमिका घेत अजय भोईर यांच्यावर लोखंडी शस्त्राने हल्ला केला. त्यांना वाचविण्यासाठी पुढे आलेले चेतन म्हात्रे व उद्धव भोईर यांनाही मारहाण करण्यात आली. वाद शांत करण्यासाठी हस्तक्षेप करणारे मॅंग्रोज रिसॉर्टचे मालक हरेश बारी यांनाही हल्ल्यात जखमी व्हावे लागले.

या घटनेनंतर लग्न सोहळ्यातील उपस्थितांमध्ये तीव्र संताप व्यक्त झाला असून काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. माहिती मिळताच केळवा सागरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. या प्रकरणी केळवा सागरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून चारही जखमींवर पालघर येथील धडा हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक विजया गोस्वामी करीत आहेत.

# रिसोडमध्ये इतिहास घडला !

## – ३३ वर्षांनंतर भाजपाची सत्ता – भगवानराव क्षीरसागर यांचा दणदणीत विजय
## – नकुल देशमुख यांच्या नेतृत्वाखाली कमळ फुलले, जनतेचा विश्वास ठाम

■ दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**रिसोड - प्रतिनिधी**
**विजय जुंजारे**

**रिसोड :** रिसोड नगरपरिषद निवडणुकीत राजकीय इतिहासाची नवी नोंद झाली असून, भारतीय जनता पार्टीने तब्बल ३३ वर्षांनंतर सत्तेवर आपला झेंडा फडकावला आहे. भाजप-शिवसेना युतीचे अधिकृत उमेदवार भगवानराव क्षीरसागर यांनी नगराध्यक्ष पदावर दणदणीत विजय मिळवत रिसोडकरांचा विश्वास संपादन केला आहे.

या ऐतिहासिक विजयामागे भाजपाचे मालगाव विधानसभा निवडणूक प्रमुख नकुल दादा देशमुख यांचे कुशल नेतृत्व, अचूक रणनिती व संघटनात्मक ताकद निर्णायक ठरली. तसेच मंत्री अनंतराव देशमुख यांच्या मार्गदर्शनामुळे भाजपाची पकड रिसोडमध्ये अधिक मजबूत झाली आहे.




**विजयाचा जल्लोष, गुलालाची उधळण**

निकाल जाहीर होताच संपूर्ण रिसोड शहरात आनंदोत्सवाचे वातावरण पाहायला मिळाले. कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिकांनी गुलाल उधळत, फटाक्यांची आतषबाजी करत हा ऐतिहासिक विजय जल्लोषात साजरा केला.

**जनतेचा स्पष्ट कौल – विकासाला संधी**

या निवडणुकीत भाजप-शिवसेना युतीने स्पष्ट बहुमत मिळवत विरोधकांना मोठा धक्का दिला. नगरपरिषदेवर प्रथमच भाजपाची सत्ता स्थापन झाल्याने रिसोडच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

**नगराध्यक्ष भगवानराव क्षीरसागर यांचा विकासाचा संकल्प**

निवडीनंतर बोलताना नगराध्यक्ष भगवानराव क्षीरसागर म्हणाले, हा विजय माझा वैयक्तिक नसून रिसोडच्या जनतेचा आहे. शहराचा सर्वांगीण विकास, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधा प्राधान्याने पूर्ण करण्याचा माझा निर्धार आहे.

**भाजपाची ऐतिहासिक कामगिरी**

या नगरपरिषद निवडणुकीत भाजप-शिवसेना युतीने २४ पैकी बहुसंख्य जागांवर विजय मिळवत आपली राजकीय ताकद सिद्ध केली आहे. ३३ वर्षांची प्रतीक्षा संपवत भाजपाने रिसोडमध्ये ऐतिहासिक विजय मिळवला आहे.

# पोलीस सेवेतून सायकलिंगच्या शिखरापर्यंत

## रमा करमरकर यांची झेप

■ दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**चिपळूण- प्रतिनिधी**
**स्वाती हडकर**

**चिपळूण :** पोलीस कर्तव्य, शिस्त आणि अपार जिद्दीच्या बळावर चिपळूणच्या सौ. रमा करमरकर यांनी पोलीस सेवेतून थेट सायकलिंगच्या शिखरापर्यंत मजल मारली असून 'सुपर रॅंडोनिअर' हा मानाचा किताब पटकावला आहे. त्यांच्या या यशामुळे चिपळूणसह संपूर्ण कोकणात गौरवाची भावना निर्माण झाली आहे. ऑडॅक्स इंडिया रॅंडोनिअर्स संलग्न सह्याद्री रॅंडोनिअर्स, चिपळूण यांच्या वतीने आयोजित बीआरएम (Brevet de Randonneurs Mondiaux) सायकल स्पर्धांमध्ये त्यांनी २००, ३००, ४०० व ६०० किलोमीटरच्या सर्व अंतरांची यशस्वी पूर्तता केली. विशेष म्हणजे या सर्व रायड्स पूर्णपणे 'सेल्फ-सपोर्टेड' स्वरूपाच्या असतात.

बीआरएम स्पर्धांमध्ये २०० किमी साठी १३.५ तास, ३०० किमी साठी २० तास, ४०० किमी साठी २७ तास तर ६०० किमी साठी ४० तासांची कमाल वेळ निश्चित असते. २० डिसेंबर रोजी सौ. रमा करमरकर यांनी ६०० किमीची अत्यंत कठीण रायड ठरावीक वेळेत पूर्ण करत 'सुपर रॅंडोनिअर' हा किताब



आपल्या नावावर केला. या यशाबद्दल बोलताना त्या म्हणाल्या, 'चिपळूण सायकलिंग क्लबच्या सर्व सदस्यांचे सहकार्य, मार्गदर्शन आणि मिळालेली प्रेरणा यामुळेच हे यश शक्य झाले.' सौ. रमा करमरकर या चिपळूण पोलीस स्थानकात हेड कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत असून, कर्तव्याबरोबरच क्रीडा आणि समाजसेवेतही त्या सातत्याने सक्रिय आहेत. २०२२ च्या महापुरात अडकलेल्या नागरिकांचे प्राण वाचवल्याबद्दल त्यांना यापूर्वी अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल चिपळूण सायकलिंग क्लब, मित्रपरिवार तसेच समाजातील विविध घटकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पोलीस सेवेसोबत क्रीडाक्षेत्रातही सर्वोच्च यश मिळवणाऱ्या सौ. रमा करमरकर आज अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत.

(पान १ वरून...)

## ठाकरे बंधुंच्या युतीच्या घोषणेची वेळ...

दरम्यान, मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना उबाठा पक्षाच्या नेत्यांची जागा वाटपासंदर्भात बैठक झाली असून आता दोन्ही प्रमुख नेते एकत्र येणार आहेत. या दोन्ही नेत्यांकडून उद्या दुपारी ठाकरे बंधूंच्या युती आणि जागावाटपाची घोषणा केली जाऊ शकते.

नुकतेच पत्रकार परिषदेत संजय राऊत यांनी, युती झालेली असून केवळ जागावाटपासंदर्भातली घोषणा बाकी आहे. आमच्यात जागा वाटपावरून कोणताही विसंवाद नाही. वरळीमधील डोममध्ये जेव्हा दोन भाऊ एकत्र आले तेव्हाच युती झाली, असे सांगितले. त्यानंतर आता ट्विट करुन संजय राऊत यांनी युतीच्या घोषणेचा मुहूर्त सांगितला आहे.

## भारताशी समेट करा नाहीतर...

बांगलादेशातील माजी मंत्री मोहिबुल हसन चौधरी म्हणाले की, 'भारतविरोधी निदर्शने केवळ ढाका आणि चटगावच्या काही भागांपुरती मर्यादित आहेत. असे नाही की संपूर्ण देशात भारतविरोधी भावना आहे. वेगवेगळ्या संस्थांमधील काही उग्र, अतिरेकी, कट्टरपंथी विद्यार्थ्यांनी, अनेक मदरशांतील विद्यार्थ्यांना आपल्यासोबत सामील होण्यास भाग पाडले आहे. यामध्ये कौमी मदरसे आणि स्वतः ढाका विद्यापीठाचे विद्यार्थीही सामील आहेत. जे मदरशांतील विद्यार्थी कॅम्पसमध्ये राहतात, ते खाण्यापिण्यासाठी आणि राहण्यासाठी पूर्णपणे मशिदींवर अवलंबून असतात. जर त्यांना या मिरवणुकांमध्ये सामील होण्यास भाग पाडले गेले, तर त्यांच्याकडे दुसरा कोणताही पर्याय नसतो. असे न केल्यास, ते त्यांची एकमेव आश्रयस्थान, जेवण आणि राहण्याची जागा गमावून बसतील.

This Daily Printed, Published and Owned by **Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** Printed at Girish Printers and Paper Converters, 150, Shaniwar Peth, Near Amruteshwar Mandir, Pune (M.S.)-411030 and Published at Flat No.806, 8 th Floor, Ratan Neptune, Handewadi Road, Hadapsar, Pune (M.S.)-411028 ■ **Editor : Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** ■ Mob No.: **9373504748** ■ Email **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (JURISDICTION AT PUNE)

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक **श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** यांनी गिरीष प्रिंटर्स अँड कन्व्हर्टर्स, १५०, शनिवार पेठ, अमृतेश्वर मंदिराजवळ, पुणे (महाराष्ट्र)- ४११०३० येथे छापून फ्लॅट नं.८०६, ८ वा मजला, रतन नेपच्युन, हंडेवाडी रोड, हडपसर, पुणे (महाराष्ट्र)-४११०२८ येथून प्रकाशित केले. ■ **संपादक - श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** ■ मो.नं.**9373504748** ■ Email - **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (सर्व वाद पुणे न्याय कक्षेत)

# विनोद पावडे यांच्या पशु प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नांदेड - प्रतिनिधी
शिलरतन लोखंडे




**नांदेड :** दक्षिण भारतामध्ये प्रसिद्ध असलेल्या माळेगाव येथील खंडोबा यात्रेमध्ये नांदेड शहरातील पशु प्रेमी विनोद पावडे यांनी आपले पशु प्रदर्शन भरवले असून या प्रदर्शनास राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते तसेच यात्रेतील भाविक भक्त मोठया प्रमाणात भेट देत असून त्यांच्या पशु प्रदर्शनास उत्कृष्ट प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.

नांदेड येथील सामाजिक कार्यकर्ते तसेच पशु प्रेमी विनोद पावडे यांनी आपले गाय घोडा, वळू, बेल, पोपट, मांजर, कुत्रा यांचे प्रदर्शन भरवले असून पाळीव श्वान, पोपट यांना प्रशिक्षण दिले असून ते विनोद पावडे यांच्या सांगण्यानुसार हालचाली करत असल्याचे बघून दर्शक मंडळी आश्चर्यचकीत होत आहेत. या पशु प्रदर्शनास राज्याचे सहकार राज्यमंत्री बाबासाहेब पाटील, लोहा कंधारचे आ.प्रताप पाटील चिखलीकर, लोहा नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष शरद पवार यांच्यासह राजकीय सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच भाविक भक्त मोठया उत्साहाने भेट देत असून विनोद पावडे यांचा उत्साह वाढवत असल्याचे दिसून येत आहे.

# भोकर नगर परिषदेवर पहिल्यांदाच भाजपाचा झेंडा

## खा.अशोकराव चव्हाण यांची रणनीती यशस्वी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
भोकर - प्रतिनिधी
विजयकुमार चिंतावार

**भोकर / नांदेड :** येथील नगर परिषदेच्या अटीतटीच्या निवडणुकीत मतदारांनी धनशक्तीला नकार देत समाजसेवेचा जनशक्तीचा वसा जपणाऱ्या नव्या आणि नवतरुण उमेदवारांना संधी दिली. या निवडणुकीत खासदार अशोकराव चव्हाण यांची रणनीती यशस्वी ठरली असून, इतिहासात प्रथमच भोकर नगर परिषदेवर भाजपाचा झेंडा फडकला आहे. भाजपाचे भगवान नारायणराव दंडवे यांनी अध्यक्षपदाच्या निवडणुकीत विजय मिळविला.

नगरसेवक पदासाठी झालेल्या चुरशीच्या निवडणुकीत भाजपाने १३ जागांवर विजय मिळवला. मराठवाडा जनहित पार्टी ०४, अपक्ष ०३ जागा पटकावल्या, तर राष्ट्रवादी काँग्रेसने आपले खाते खोलत ०२ जागांवर समाधान मानावे लागले. एकूण २२ नगरसेवक निवडून आले आहेत. तर विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेस पक्ष निवडणुकीच्या लढतीत मात करेल असे वाटत असतानाच त्यांना एकही जागा मिळत आली नाही त्यामुळे त्यांना खाते ही खोलता आले नाही, यासोबतच शिवसेना शिंदे गट, वंचित बहुजन आघाडी, एम. आय. एम. याही पक्षांना खाते खोलता आले नाही.

या निवडणुकीत अनेक प्रभागांमध्ये अनपेक्षित निकाल लागले. प्रभाग क्रमांक ०१ मध्ये गेल्या पंधरा वर्षांपासून सत्तेत असलेले आणि भोकर शहरातील ज्येष्ठ नेते तसेच अशोकराव चव्हाण यांचे कट्टर समर्थक विनोद पाटील चिंचाळकर यांचा दारुण पराभव झाला. नवख्या अपक्ष उमेदवार साईप्रसाद जटालवार यांनी त्यांचा पराभव केल्याने हा निकाल राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे. एम.आय.एम. च्या प्रभावामुळे काँग्रेसचे उमेदवार अनेक प्रभागांत पिछाडीवर राहिल्याचे चित्र दिसून आले. मुस्लिम मतदारांवर लक्ष केंद्रित करून खा. अशोकराव चव्हाण यांनी आखलेली रणनीती काही प्रभागांत परिणामकारक ठरल्याचे निरीक्षण नोंदवले जात आहे.

प्रभाग क्रमांक ०१ मध्येच विद्यमान नगरसेवक व नगरपरिषद सभापती डॉ. अनिता राम नाईक यांचा पराभव राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नवख्या उमेदवार वैशाली गणेश बोल्लेवार यांनी त्यांचा पराभव करीत विजय मिळवला. भारतीय जनता पार्टीचे नगराध्यक्ष भगवानराव नारायणराव दंडवे यांनी २७२१ मतांनी बाजी मारली काँग्रेसचे संदीप गौड विजयी ठरतील अशी चर्चा असतानाही त्यांना तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. बहुजन नेते म्हणून ओळखले जाणारे नागनाथ घिसेवाड हे राष्ट्रवादी काँग्रेसकडून अध्यक्षपदाचे उमेदवार होते; मात्र अपेक्षित यश न मिळाल्याने ते चौथ्या क्रमांकावर राहिले.

**प्रभागनिहाय**

प्रभाग क्रमांक ०१–१) राष्ट्रवादीचे वैशाली गणेश बोल्लेवार अ मिळालेली– मते ६७५, २) अपक्ष साईप्रसाद सूर्यकांतराव जटालवार ब मिळालेली मते ५०४.

प्रभाग क्रमांक ०२–१) भाजप शिल्पा पंकज पोकलवार अ मिळालेली मते – ८७७, २) भाजप विठ्ठल अनिलराव धोंडगे ब मिळालेली मते ७७३

प्रभाग क्रमांक ०३ –१) भाजप आरती गणेश यशवंतकर अ मिळालेली मते– ११४०, २) भाजप योगेश लक्ष्मीकांत भोकरकर ब मिळालेली मते ९११.

प्रभाग क्रमांक ०४–१) भाजप सपनाराणी सिद्धेश्वर पिटलेवाड अ मिळालेली मते १०४९,२) भाजप सुहास खंडू पवार ब मिळालेली मते ९०५

प्रभाग क्रमांक ०५–१) भाजप वनश्री दिनेश लक्षटवार अ मिळालेली मते – १३४१, २) अपक्ष राजेश्वर विनायक देशमुख ब मिळालेली मते –११३२

प्रभाग क्रमांक ०६–१) मराठवाडा. ज. पार्टी डॉ. कनिज फातेमा इनामदार अ मिळालेली मते ७१४, २) मराठवाडा ज. पार्टी इनामदार साबेराबेगम गुलाम मोहीमोद्दीन ब मिळालेली मते ७९५

प्रभाग क्रमांक ०७–१) भाजप दिलीप गुरप्पा सोनवडे अ मिळालेली मते – १२२४, २) भाजप माया गौतम कसबे ब मिळालेली मते १३३३

प्रभाग क्रमांक ०८–१) भाजप अविनाश दिलीप वाघमारे अ मिळालेली मते–९८३, २) अपक्ष अर्चना बालाजी बिल्लरवार अंदबोरीकर ब मिळालेली मते ९४४

प्रभाग क्रमांक ०९–१) भाजप वनमाला पुंडलिक क्षीरसागर अ मिळालेली मते ८४०, २) राष्ट्रवादी काँग्रेस संजय सुभाष घंटालवार ब मिळालेली मते ९३७

प्रभाग क्रमांक १०–१) मराठवाड जं. पार्टी नाजिम मौलाना शेख अ मिळालेली मते १००३, २) मराठवाडा ज. पार्टी शेख जरीना बेगम युसूफ ब मिळालेली मते १०६४

प्रभाग क्रमांक ११–१) भाजप छाया मनोजकुमार गिमेकर अ मिळालेली मते ८७४, २) भाजप विजय गंगाधर पवार ब मिळालेली मते ९१५

प्रभाग १ – ब : माजी नगरसेवक जवाजोदिन बडबडेकर व माजी नगराध्यक्ष विनोद चिंचाळकर यांच्याशी झालेल्या अटीतटीच्या लढतीत नवख्या अपक्ष उमेदवार साईप्रसाद जटलवार यांनी लोक जनसंपर्कातून विजय मिळविला. काम केल्यासच जनता निवडून देते हे मतदारांनी पुन्हा सिद्ध केले.

प्रभाग २ अ : शिंदे गटाचे तालुका अध्यक्ष माधव पाटील वडगावकर यांच्या पत्नी लक्ष्मी माधव जाधव यांचा शिल्पा पंकज पोकलवार यांनी पराभव केला.

प्रभाग २–ब: माजी सरपंच व नगरसेवक शिवाजी पांचाळ यांचा भाजपाचे विठ्ठल धोंडगे यांनी पराभव केला.

प्रभाग ३–अ: काँग्रेसचे तालुका अध्यक्ष गोविंद बाबा गौड यांच्या भावजयी मंजुषा नागनाथ कोंडलवार यांचा निसटता पराभव झाला.

प्रभाग ४: बहुजन नेते नागनाथ घिसेवाड यांच्या पत्नीचा नवख्या उमेदवार सपनाराणी पिटलेवाड यांनी पराभव केला.

प्रभाग ४–ब: माजी नगरसेवक वकील खैराती यांचा भाजप चे युवा उमेदवार सुहास पवार यांनी पराभव केला.

प्रभाग ५–ब: भाजपाचे सलग दोन वेळेस शहराध्यक्ष असलेले विशाल माने यांचा अपक्ष उमेदवार राजेश्वर देशमुख यांनी ३८३ मतांनी पराभव केला. हा निकाल भाजप साठी मोठा धक्का मानला जात आहे.

प्रभाग ८: भाजपाच्या शिंदे साधना केशव यांचा अर्चना बालाजी बिलरवार यांनी पराभव केला.

प्रभाग ९: मामाभाचा च्या लढतीत भाजपाचे बालाजी पाटील यांचा पराभव करून राष्ट्रवादी काँग्रेसचे संजय पाटील घंटलवार विजयी झाले.

प्रभाग १०: काँग्रेस शहराध्यक्षांच्या पत्नीचा पराभव करत जरीना शेख युसुफ यांनी दमदार विजय मिळविला.

प्रभाग ११: माजी नगरसेवक व राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार केशव मुद्देवाड यांचा नवख्या उमेदवार विजय पवार यांनी पराभव केला.

निवडणूक निर्णय अधिकारी विनोद गुंडमवार यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि नियोजनबद्ध पार पडली. निकाल जाहीर होताच विजयी उमेदवारांनी विजय रॅली काढून मतदारांचे आभार मानले. या रॅलीत माजी मुख्यमंत्री व खासदार अशोकराव चव्हाण तसेच आमदार श्रीजया चव्हाण यांनी सहभाग नोंदवला. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली भोकर पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांनी सुरळीतपणे पार पडली.

# अंजनगाव सुर्जी येथे निवडणूक निकालानंतर हिंसाचार

## लाथाबुक्क्यांच्या मारहाणीत इसमाचा मृत्यू

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
प्रतिनिधी - अनिल गौर

### १२ जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल

**अंजनगाव सुर्जी :** शहरातील आठवडी बाजार परिसरातील वेल्डिंग दुकानासमोर निवडणूक निकालाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या वादातून झालेल्या अमानुष मारहाणीत एका इसमाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२ ते १२.३० वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी अंजनगाव सुर्जी पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ६१३/२५ अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून १२ आरोपींविरुद्ध गंभीर कलमान्वये कारवाई करण्यात आली आहे. याप्रकरणी मो.अखलाल मो. जाकीर (वय २९, धंदा संत्रामंडी,रा. कुरेशी नगर, अंजनगाव सुर्जी) यांनी फिर्याद दिली आहे. निवडणुकीत प्रभाग क्रमांक १० मध्ये उबाठा शिवसेना गटाच्या उमेदवार शहनाज बानो अब्दुल सलिम व काँग्रेस पक्षाच्या उमेदवार नाजिया परवीन मोहम्मद इरफान यांच्यात लढत होती. निकालानंतर आनंद व्यक्त करतांना काही जणांकडून आक्षेपार्ह वक्तव्य करण्यात येत असल्याने वादाला सुरुवात झाली.वाद वाढू नये म्हणून फिर्यादी व इतर नागरिक ग्रामीण रुग्णालया कडून जात असताना आरोपींनी शिवीगाळ करत हसण्यावारी नेले. त्यावेळी समजावून सांगत असतानाच आरोपी मो. साकीब मो.इद्रिस रा .काजीपुरा अ. मोईन, इफतेखार अहमद कुरेशी नगर, यांनी फिर्यादीचे वडील मोहम्मद जाकीर शेख नजीर (वय ६०, कुरेशी नगर, अंजनगाव सुर्जी) यांच्यावर अचानक हल्ला चढवला. लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करून त्यांना जमिनीवर पाडण्यात आले व छातीवर जोरदार लाथा मारण्यात आल्या. या मारहाणीत ते जागीच बेशुद्ध पडले.

जखमी अवस्थेत त्यांना खाजगी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले असता डॉक्टरांनी मोहम्मद जाकीर शेख नजीर मृत घोषित केले. त्यानंतर अंजनगाव सुर्जी ग्रामीण रुग्णालयात मृतदेह आणण्यात आला. फिर्यादीच्या लेखी तक्रारीवरून पोलिसांनी बीएनएसचे कलम १०३(१), १८९(२),२९६, १९१(२),१९०,११५ (२) अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

भा.दं.वि. कलम ३०२, १४३,२९४, १४७, १४९, २९४, ३२३ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

या प्रकरणातील आरोपींमध्ये औसाफ रफिक, मुजतबा कदीर, इफतेखार अहमद, फैजान, साकीब, अजहर, अदिल मास्टर यांच्यासह एकूण १२ जणांचा समावेश आहे. पुढील तपास अंजनगाव सुर्जी पोलिस करीत असून घटनेमुळे शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# संत नामदेव महाराज कनिष्ठ महाविद्यालय पेठवडज येथे

## राष्ट्रीय गणित दिन उत्साहात साजरा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
पेठवडज - प्रतिनिधी
सूर्यकांत रामराव पैनापल्ले



**पेठवडज :** स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ पेठवडज तालुका कंधार जिल्हा नांदेड संचलित संत नामदेव महाराज कनिष्ठ महाविद्यालय पेठवडज येथे गणित विभागाच्या वतीने राष्ट्रीय गणित दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य गोणारकर बीसी तर प्रमुख पाहुणे प्राध्यापक हिप्परगेकर एन एम व प्राध्यापक किनवाड जी व्ही उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते श्रीनिवासा रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मान्यवरांचे स्वागत समारंभ झाल्यानंतर कुमारी शिंदे संजीवनी हिच्या स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले यामध्ये प्रणव पारडे, अन्वर शेख, मारोती बकवाड, कु. अंबिका अभंगे, कु. अंजली चेरले, कु. रूपाली गायकवाड, कु. रूपाली बकवाड, कु. दिपाली गायकवाड, कु.अंजली अनकाडे, कु. अंजली घुमलवाड या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या कार्यक्रमात कु. रोहिणी पाटील व कु. अंबिका अभंगे यांनी गणितीय उखाणे अतिशय सुंदर रित्या सादर केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे गणित विभाग प्रमुख प्रा. होनवडजे एन एम यांनी आपले मनोगत व्यक्त केले यामध्ये गणित हा विषय केवळ अभ्यासाचा विषय नसून तो जीवनाचा अविभाज्य भाग आहे. सध्याच्या काळात गणित विषयामुळे विविध क्षेत्रात प्रचंड बदल होत असून त्याचा उपयोग अधिक प्रमाणात शोधण्याची गरज आहे. श्रीनिवासा रामानुजन यांचा जन्मदिवस गणित दिन मधून भारतभर साजरा केला जातो.

श्रीनिवासा रामानुजन हे भारताचे महान गणिततज्ञ होते. त्यांचा जन्म २२ डिसेंबर १८८७ रोजी तामिळनाडू राज्यातील तंजावर जिल्ह्यात ऐरोड या सामान्य कुटुंबात झाला. रामानुजन यांनी अनेक सूत्रे, प्रमेय, सिद्धांत, श्रेणी विभाजन, संख्या ज्ञान या संदर्भातील सूत्रे त्यांनी इंग्लंडमधील प्रसिद्ध गणिततज्ञ जी एच हार्डी यांच्यासोबत केंब्रिज विद्यापीठात कार्य केले. इंग्लंड मध्ये वास्तव्यात असताना त्यांनी २१ शोध प्रबंध सादर केले. दिनांक २६ एप्रिल १९२० रोजी वयाच्या अवघ्या तेहत्तीसाव्या वर्षी प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटावा अशा या थोर गणित तज्ञाचे निधन झालं.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले प्रा. हिप्परगेकर एन एम यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात गणित विषयाचे महत्त्व स्पष्ट केले. शालेय जीवनात गणित विषयाचे खरे महत्व लक्षात येत नाही, अनेकदा संकल्पना पूर्णपणे समजत नाही. दैनंदिन जीवनात गणिताचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असल्याने उदाहरणासह स्पष्ट केले. सध्याच्या जगात ऑनलाईन ट्रांजेक्शन, एनक्रीप्शन व डिस्क्रिप्शन, ओटीपी प्रणाली,पासवर्ड निर्मिती यामध्ये गणितीय संकल्पना चा मोठा वाटा आहे असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता अकरावी विज्ञान शाखेतील कु. दुर्गा अभंगे यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा.परतवाड डी जी यांनी केले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी, विद्यार्थिनी व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे तालुक्याच्या ठिकाणी शिकाऊ व पक्के अनुज्ञप्ती शिबिराचे आयोजन

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नांदेड - प्रतिनिधी
प्रा.विजयकुमार दिग्रसकर

**नांदेड :** प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे शिकाऊ व पक्के अनुज्ञप्तीसाठी माहे जानेवारी ते जून २०२६ या महिन्यात तालुका शिबिर कार्यालयाचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरासाठी जागा उपलब्धतेच्या आधीन राहून ऑनलाईन अपॉईटमेंट महिना सुरुवात होण्याच्या ५ दिवस आधी कार्यालयीन वेळेत सुरु करण्यात येईल. तरी अपॉईटमेंट घेतलेल्या अर्जदारांनी यांची नोंद घेवून शिबिर कार्यालयास उपस्थित राहावे, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विनय शिवराम अहिरे यांनी केले आहे. तालुकानिहाय कॅम्पचे ठिकाण व दिनांक पुढीलप्रमाणे आहे. कंधार येथे २ जानेवारी, ३ फेब्रुवारी, ४ मार्च, ३ एप्रिल, ४ मे, ३ जून २०२६ यादिवशी आहे. धर्माबाद येथे ५ जानेवारी, ५ फेबुवारी, ६ मार्च, ६ एप्रिल, ६ मे, ५ जून २०२६ यादिवशी करण्यात आले आहे. किनवट येथे ९ जानेवारी, ९ फेबुवारी, ९ मार्च, ९ एप्रिल, ११ मे, १० जून २०२६ रोजी करण्यात आले आहे. मुदखेड येथे १३ जानेवारी, १३ फेब्रुवारी, १३ मार्च, १३ एप्रिल, १३ मे, १२ जून २०२६ रोजी करण्यात आले आहे. माहूर येथे १६ जानेवारी, १६ फेब्रुवारी, १६ मार्च, १५ एप्रिल, १५ मे, १५ जून २०२६ रोजी करण्यात आले आहे. हदगाव येथे १९ जानेवारी, १८ फेब्रुवारी, १८ मार्च, १७ एप्रिल, १८ मे, १८ जून २०२६ रोजी करण्यात आले आहे. धर्माबाद येथे २३ जानेवारी, २३ फेब्रुवारी, २३ मार्च, २३ एप्रिल, २२ मे, २२ जून २०२६ रोजी करण्यात आले आहे. हिमायतनगर येथे २८ जानेवारी, २५ फेब्रुवारी, २७ मार्च, २७ एप्रिल, २६ मे, २५ जून २०२५ रोजी करण्यात आले आहे. किनवट येथे ३० जानेवारी, २७ फेब्रुवारी, ३० मार्च, २९ एप्रिल, २९ मे , २९ जून २०२६ रोजी करण्यात आले आहे. शिकाऊ व पक्क्या अनुज्ञप्तीसाठी तालुक्याच्या ठिकाणी मासिक शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच वरील शिबिराच्या दिवशी स्थानिक सुटटी जाहीर झाल्यास अथवा आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास शिबिराच्या तारखेमध्ये बदल होवू शकतो याची नागरिकांनी नोंद घ्यावी, असेही प्रसिध्दीपत्रकान्वये कळविले आहे.

# मोहेकर महाविद्यालयाची विद्यार्थिनी प्रतीक्षा गायकवाड हिची वनरक्षक पदी निवड



दै.चालु वार्ता वृत्तसेवा
धाराशिव - प्रतिनिधी
समीर मुल्ला

**धाराशिव :** कळंब येथील शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयाची विद्यार्थिनी आणि ७ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन एनसीसी, छत्रपती संभाजीनगरची कॅडेट कुमारी प्रतीक्षा गायकवाड हिची वनरक्षक (Forest Guard) पदी निवड झाली आहे.

प्रतीक्षा ही महाविद्यालयात १२ वी कला शाखेत शिक्षण घेत असून, तिने आपल्या कठोर परिश्रमाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. तिच्या या यशात एनसीसीचा शिस्तप्रिय सराव आणि मार्गदर्शकांचा मोठा वाटा आहे. तिला महाविद्यालयाच्या एनसीसी अधिकारी लेफ्टनंट सरस्वती वायबसे, तसेच ७ महाराष्ट्र बटालियनचे हवालदार सोहन सिंग आणि सुभेदार आवळेकर एस.आर. यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

तिच्या या निवडीबद्दल ज्ञानप्रसारक मंडळ येरमाळा चे सचिव डॉ. अशोक मोहेकर, संचालक डॉ संजय कांबळे , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हेमंत भगवान, उपप्राचार्य डॉ. के.डी. जाधव, प्रा. जयवंत भोसले, प्रा. विलास अडसूळ महाविद्यालय प्रशासन, शिक्षक वृंद आणि परिसरातून तिचे कौतुक होत आहे.

# पाबळ येथील श्री पद्ममणी जैन इंग्लिश स्कूलचा २४ वा वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
शिक्रापुर - प्रतिनिधी
प्रफुल्ल गायकवाड




**पाबळ :** येथील श्री पद्ममणी जैन इंग्लिश स्कूल, शाळेचा २४ वा वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा हा कार्यक्रम पालक, शिक्षक व ग्रामस्थांच्या उपस्थितीत संपन्न झाला. व तसेच आचार्य महाबोधी यांनी प्रवचन रुपी आशीर्वाद व शुभेच्छा दिल्या. या शाळेत नर्सरीपासून ते दहावीपर्यंतचे वर्ग असून सध्या शाळेत एकूण ५०५ विद्यार्थी–विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांनी सादर केलेली सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य, नाट्य व गीतांनी उपस्थितांची मने जिंकली.

सन २००२ साली स्थापन झालेली ही शाळा आज गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी परिसरात ओळखली जाते. शाळेची शैक्षणिक वाटचाल सातत्याने प्रगतीपथावर असून दरवर्षी विद्यार्थीसंख्येत वाढ होत आहे. शिस्त, संस्कार व आधुनिक शिक्षण यांचा समतोल साधत शाळा पुढे जात असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. या वार्षिक स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळत असून शाळेच्या उज्ज्वल भवितव्याबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पाबळ गावचे सरपंच सोपानराव जाधव सरपंच सचिन वाबळे, पाबळ पोलीस स्टेशनचे देशमुख साहेब, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत गायकवाड, निकेत घाटकर. नितीन गायकवाड तसेच श्री भैरवनाथ विद्य मंदिर, पाबळ येथील प्राचार्य एस. डी. पिंगळे सर उपस्थित होते. याशिवाय शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्यही मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हर्षद गांधी, सचिव सुनील राठोड, सदस्य जयेश शहा, गिरीश शहा, केतन शहा तसेच भूषण गांधी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा वायकर यांनी कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवर, पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

# देखभाल–दुरुस्तीसाठी आज शहराच्या विविध भागांत वीजपुरवठा खंडित राहणार

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**नागपूर - प्रतिनिधी**
**सतीश कडू**

**नागपूर :** शहरातील वीज यंत्रणेची कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि भविष्यातील तांत्रिक बिघाड टाळण्यासाठी महावितरणतर्फे नियमित देखभाल व अत्यावश्यक दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांमुळे बुधवार, दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी शहरातील विविध भागांचा वीजपुरवठा ठराविक कालावधीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे.

या नियोजित कामांमुळे होणाऱ्या संभाव्य गैरसोयीबद्दल महावितरणने दिलगिरी व्यक्त केली असून, वीज ग्राहकांनी या काळात संयम राखून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणच्या वतीने करण्यात आले आहे. या कामांमुळे महाल विभागात सकाळी ९ ते दुपारी १ यावेळेत महालक्ष्मी नगर, प्रक्रिया सभागृह, म्हाळगी नगर, अष्टविनायक कॉलनी. सकाळी ७ ते ११ या वेळेत एनआयटी गार्डन, महाकाळकर सभागृह, बसवेश्वर पुतळा, मधुबन अपार्टमेंट, शिवाजी सभागृह, दत्तात्रय नगर, नवीन सुभेदार, समर्थ वाटिका परिसर. तर सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत जुनी मंगळवारी, धिवरपुरा, चंद्रशेखर आझाद चौक, स्वीपर कॉलनी, हत्तीनाला, हिरा प्लाझा परिसरातील वीज पुरवठा बंद राहील.

कॉंग्रेसनगर विभागात सकाळी ८ ते १२ या वेळेत गिरीपेठ, वसंतराव नाईक वसाहत, गवळीपुरा, पोलीस विभाग, ट्रॅफिक पार्क, सकाळी ८ ते ११ या वेळेत दंडीगे लेआउट, शंकरनगर, सकाळी ८ ते १० या वेळेत चितळे मार्ग धंतोली, दगडी पार्क रामदासपेठ, सकाळी ८ ते ९ या वेळेत छोटी धंतोली सकाळी ८ ते ९:३० या वेळेत विश्वनाथ अपार्टमेंट, धंतोली, विश्वनाथ अपार्टमेंट, धंतोली, सकाळी ९ ते ११ या वेळेत रेल्वे स्टेशन मार्केट, टेकडी लाईन, एअर फोर्स ऑफिस, फिश मार्केट हिंदुस्थान कॉलनी, समर्थ नगर, गजानन नगर या भागात तर सकाळी ९ ते १२ या वेळेत जय बद्रीनाथ सोसायटी, स्वागत सोसायटी, मनीष लेआउट, दुपारे लेआउट, पाटील लेआउट, भेंडे लेआउट, राऊत वाडी गायत्री नगर, परसोडी, दत्त मंदिर, हनुमान मंदिर परिसर, गोपाल नगर गल्लि क्रमांक ६९, नाईक लेआउट मंदिर गोपाल नगर, टेलीकॉम नगर, स्वावलम्बी नगर, फ्रेंड्स कॉलनी, रवींद्र एनगर, गावंडे लेआउट, पायोनियर सोसायटी, स्वरूप नगर, सुभाष नगर, नेल्को सोसायटी, जोशी लेआउट, कामगार कॉलनी, तुकडोजी नगर, हॉस्पिटल लेआउट, शालेयनगर हॉस्पिटल, कन्नमवार नगर, कर्वे नगर, उज्ज्वल नगर ,कॉस्मो सोसायटी, पर्यावरण नगर, पावनबुमी, सावित्री विहार, श्रीरामनगर, डिगोलिस सेंटर, सोमलवाडा चौक, वंदना अपार्टमेंट, तर सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत शुभांगी नगर,श्रीधर, वेंकटेश सिटी,गौरी मिडास, आयटीआय कॉलनी, निवास सोसायटी, सिताबाई घाट या भागातील वीजपुरवठा बंद राहील.

सिव्हिल लाईन्स विभागात सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत पेन्शन नगर, नेहरूकॉलनी, रामदेव बाबा कॉलेजचा मागील परिसर, वर्मा फ्लोअर मिल, नंदनवन क्लासिक अपार्टमेंट, सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत मानकापूर चौक, पोस्ट ऑफिस, मानकापूर जुनी वस्ती, म्हाडा कॉलनी, नागसेन सोसायटी, डॉ. आंबेडकर सोसायटी, शिवाजी कॉम्प्लेक्स, गाडगेबाबा सोसायटी, तर सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत सीपीडब्ल्यूडी क्वार्टर, कम्युनिटी हॉल, एसएफएस कॉलेज, एमईएस वॉटर पंप, मानवता नगर, टीव्ही टॉवर चौक या भागातील वीज पुरवठा बंद राहील.

याशिवाय बुटीबोरी विभागात (औद्योगिक क्षेत्र) बुटीबोरी येथील एमआयडीसी उपकेंद्रातून वीजपुरवठा होणाऱ्या वाहिनी क्रमांक ६ वरील 'ई-झोन'मधील काही औद्योगिक ग्राहकांचा वीजपुरवठा सकाळी १०:३० बंद राहील. दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करण्याचा महावितरणचा प्रयत्न राहील. तरीही नागरिकांनी आपले पाण्याचे नियोजन व इतर महत्त्वाची कामे या वेळापत्रकानुसार आधीच आटोपून घ्यावीत आणि महावितरणच्या तांत्रिक कर्मचाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

# माळेगाव यात्रेच्या वैभवात वाढ- खासदार रवींद्र चव्हाण

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**कंधार - प्रतिनिधी**
**माधव गोटमवाड**

## भैय्या पवार यांनी जिंकली मानाची कुस्ती





**कंधार :** यात्रेचे वैभव अधिक वाढवण्यासाठी प्रशासनाच्या वतीने विविध प्रयत्न करण्यात येत असून, पुढील काळात यात्रेच्या ठिकाणी भौतिक पायाभूत सुविधा निर्माण केल्या जातील, असे प्रतिपादन नांदेड लोकसभा मतदारसंघाचे खासदार रवींद्र चव्हाण यांनी केले. माळेगाव यात्रेनिमित्त पंचायत समिती लोहा यांच्या वतीने वीर नागोजी नाईक मैदानात आयोजित करण्यात आलेल्या भव्य कुस्ती स्पर्धांचे उद्घाटन खासदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कंधार-लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची विशेष उपस्थिती होती.

या कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, माजी आमदार मोहन हंबर्डे, लोहा नगरपालिकेचे नगराध्यक्ष शरद पवार, जिल्हा परिषदेचे माजी सभापती संजय बेळगे, संजय कराळे, सरपंच प्रतिनिधी हनमंत धुळगंडे, राजेश पावडे, सुरज शिंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी.बी. गिरी आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. यावेळी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी कुस्ती स्पर्धांच्या बक्षीस रकमेत वाढ करण्यात आल्याचे सांगितले. वीर नागोजी नाईक मैदानातून अनेक नामांकित कुस्तीगीर घडले असून या मैदानाची परंपरा गौरवशाली असल्याचे त्यांनी नमूद केले.

**भैय्या पवार यांनी जिंकली मानाची कुस्ती**

माळेगावच्या कुस्ती मैदानात लोहा तालुक्यातील रामतीर्थ येथील मल्ल भैय्या पाटील पवार आणि राम तेलंग, शिवनगर, जि. परभणी यांच्यात मानाची कुस्ती खेळविण्यात आली. अनेक डावपेचांनी रंगलेल्या या कुस्तीत भैय्या पवार यांनी विजय मिळवला. त्यास ५ हजार रुपये बक्षीस देण्यात आले. भैय्या पवार यांनी कोल्हापूरच्या मोतीबाग तालमीमध्ये तीन वर्षे दादू मामा चौगुले यांच्याकडून कुस्तीचे धडे घेतले आहेत. त्यांनी परभणी, लातूर, कोल्हापूर, कुर्डूवाडी आदी ठिकाणी कुस्ती स्पर्धांमध्ये यश मिळवले आहे. दररोज व्यायाम, आठसे सूर्यनमस्कार व दीडसे दंड बैठकांचा सराव तसेच बदाम, तूप व फळांचा आहार घेत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.


# विष्णूनगरमध्ये संतस्मरणाचा भक्तीमय सोहळा

## संत वामनभाऊ महाराज व संत भगवान बाबा पुण्यतिथी उत्सव १ ते ४ जानेवारीदरम्यान

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**पालघर - प्रतिनिधी**
**रवि राठोड**

**पालघर :** पालघर शहरातील विष्णूनगर येथे संत वामनभाऊ महाराज व संत भगवान बाबा यांच्या पुण्यस्मरणार्थ २१ वा पुण्यतिथी सोहळा भक्तीभावाच्या वातावरणात आयोजित करण्यात आला आहे. हा चार दिवसीय धार्मिक कार्यक्रम गुरुवार, १ जानेवारी ते रविवार, ४ जानेवारी २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे. या पुण्यतिथी उत्सवानिमित्त अभिषेक, पूजन, हरिपाठ, भजन, प्रवचन व कीर्तन अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, १ जानेवारी रोजी सकाळी महाअभिषेक, दीपपूजन, होम-हवन व वीणापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. त्यानंतर दिवसभर प्रवचन व भजनांचे आयोजन करण्यात आले आहे.

पहिल्या दिवशी सायंकाळी वारकरी संप्रदायातील तसेच महिला भजनी मंडळांच्या भजन-जागराने परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे. रात्री श्रीक्षेत्र आळंदी देवाची



येथील ह.भ.प. डॉ. हरिदास महाराज पालवे शास्त्रीजी यांचे कीर्तन होणार आहे.

शुक्रवार, २ जानेवारी रोजी दुपारी महिला भजनी मंडळांचे हरिपाठ व भजन, संगीत विशारद प्राजक्ता उकिरडे बढे यांचे प्रवचन होणार असून रात्री श्रीक्षेत्र अंजनीगड, जिल्हा अहिल्यानगर येथील ह.भ.प. लक्ष्मण महाराज कराड यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे.

शनिवार, ३ जानेवारी रोजी सकाळी सामूहिक भजन होणार असून दुपारी दिंडी मिरवणूक काढण्यात येणार आहे. विठ्ठल नामाच्या जयघोषात निघणाऱ्या दिंडीमुळे संपूर्ण विष्णूनगर परिसर भक्तिरसमय होणार आहे. रात्री बोईसर येथील ह.भ.प. प्रदीप महाराज पाटील वासरेकर यांचे कीर्तन होणार आहे.

रविवार, ४ जानेवारी रोजी सकाळी महाअभिषेकानंतर गुरुवर्य महंत शास्त्री ब्रह्म परमपूज्य ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्रीजी यांचे काल्याचे कीर्तन होणार असून, त्यानंतर भंडारा व महाप्रसादाने या पुण्यतिथी सोहळ्याची सांगता होणार आहे. या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ भाविकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# अहमदपुरातील विद्यावर्धिनी विद्यालयात राष्ट्रीय गणित दिवस तर जागतिक ध्यान योग दिन संयुक्तपणे साजरा

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**प्रतिनिधी**
**टी.बी.वाघमारे**

**लातूर :** अहमदपूर सविस्तर माहिती अशी की तालुक्यातील मोजे जवळगा येथील नांदेड लातुर हायवेलतग कार्यरत असलेल्या जय शिव बहुउद्देशीय शिक्षण मंडळ द्वारा संचलित विद्यावर्धिनी विद्यालय, अहमदपूर येथे राष्ट्रीय गणित दिवस व जागतिक ध्यानयोग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय गणित दिवस महान भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येतो. या कार्यक्रमाची सुरुवात संस्थेच्या संस्थापक सचिव तथा मुख्याध्यापिका आदरणीय पाटील मॅडम व संस्था अध्यक्ष आदरणीय शिवाजीराव पाटील यांच्या हस्ते श्री रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक पूजा सूर्यवंशी यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी गणित हे दैनंदिन जीवनातील प्रत्येक क्षेत्रात किती उपयुक्त आहे हे सोप्या शब्दांत विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. तसेच कार्यक्रमाची रूपरेषा मांडून विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांविषयी माहिती दिली.



(संस्था प्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षक वृंद विद्यार्थीचा स्फुर्तपणे सहभाग)

या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी गणित दिनावर आधारित विविध उपक्रम सादर केले. गणिती कोडी, सूत्रांचे सादरीकरण, दैनंदिन जीवनातील गणिताचा वापर अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांनी गणिताचे महत्त्व प्रभावीपणे मांडले. या उपक्रमांमधून गणित केवळ अभ्यासाचा विषय नसून जीवनाचा अविभाज्य भाग आहे, हे सर्वांना प्रकर्षाने जाणवले.

यानंतर गणित विषय शिक्षक आशिष वाघमारे व उमाकांत श्रीमंगले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी गणित हा विषय भीतीने न शिकता अनुभवातून, कृतीतून शिकला पाहिजे, असे सांगितले. गणितामुळे तार्किक विचारशक्ती, समस्या सोडवण्याची क्षमता व आत्मविश्वास वाढतो, यावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा आदरणीय पाटील मॅडम यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपाच्या भाषणात विद्यार्थ्यांना गणित विषय आवडीचा होण्यासाठी नियमित सराव व अनुभवातून शिक्षण आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच जागतिक ध्यान योग दिनाच्या निमित्ताने ध्यान केल्यामुळे मानसिक, शारीरिक व बौद्धिक तंदुरुस्ती कशी वाढते, याचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले.

यावेळी उपस्थित संस्था अध्यक्ष शिवाजीराव पाटील साहेब यांनी जागतिक ध्यान दिनाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी सर्व विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष ध्यान करून घेतले व ध्यानाचे जीवनातील फायदे समजावून सांगितले. ध्यानामुळे एकाग्रता, शिस्त व सकारात्मक विचार वाढतात, असे त्यांनी सांगितले.

शेवटी संस्था अध्यक्षांनी सर्व विद्यार्थ्यांना राष्ट्रीय गणित दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या प्रेरणादायी मार्गदर्शनासह कार्यक्रमाची यशस्वी सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कैवल्या नलवाड यांनी केले तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीरितेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# दिव्यांग मुलांना कृत्रिम अवयव व साहित्य साधनांचे वाटप

## फियाट इंडिया ऑटोमोबाईल्सचा स्तुत्य उपक्रम..!

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**वाघोली - प्रतिनिधी**
**स्वरुप गिरमकर**




**(पुणे) वाघोली :** फियाट इंडिया ऑटोमोबाईल्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या वतीने सीएसआर 'सक्षम उपक्रमांतर्गत पंचायत समिती हवेलीच्या ३३ दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम अवयव व साहित्य साधने वाटप' कार्यक्रम रांजणगाव येथे २२ डिसेंबर रोजी संपन्न झाला.फियाट रांजणगाव कंपनीचे अध्यक्ष व सी.ई.ओ राजेश खत्री यांच्या हस्ते कृत्रिम अवयव व साहित्य साधने वितरित करण्यात आले.

हवेली तालुक्यातील ऑटिझम, अंधत्व, सेरेबल पाल्सी, बौद्धिक दिव्यांगत्व, अल्प दृष्टी, कर्णबधीर ,मानसिक आजार असलेल्या ३३ विद्यार्थ्यांचा समावेश यामध्ये होता. या विद्यार्थ्यांना क्रेचस, सी.पी.खुर्च्या, ट्रायसायकल, रोलेटर, अध्यापन अध्ययन साहित्य कीट इत्यादी साहित्य देण्यात आले. हे सर्व साहित्य विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार अलिमको टीम मार्फत तपासणी करून सहाय्यभूत साहित्य देण्यात आली. हा कार्यक्रम साहित्य वाटपा पुरता मर्यादित न राहता दिव्यांग विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर्तेकडे नेणारा एक महत्त्वाचा टप्पा ठरेल आत्मविश्वास स्वावलंबन आणि समानतेचा संदेश देणारा हा कार्यक्रम ठरेल हीच सक्षम उपक्रमाची खरी ताकद आहे असं मत राजेश खत्री यांनी बोलताना व्यक्त केले. गेले नऊ वर्षापासून सुरू असलेला हा सक्षम उपक्रम पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये यशस्वीपणे राबवला जात आहे. पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, शिक्षणाधिकारी संजय नाईकडे, गटविकास अधिकारी शेखर शेलार, गटशिक्षणाधिकारी हेमंतकुमार खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली हवेली व खेड, आंबेगाव, जुन्नर, दौंड, शिरूर या तालुक्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांनाही साहित्य वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी कंपनीचे अमोल फटाले, शुभम बडगुजर यांनी तसेच विशेष शिक्षक सुवर्णा पुंडे, गोपाळ शिवशरण, बबीता चव्हाण, ज्योती वाल्हेकर, साहीर सय्यद, बाळू चव्हाण, संतोष देशमुख, सुनीता गिरी, दिशा शेवाळे, निजामुद्दीन चिस्ती यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सीएसआर हेड संचिता कुमार यांनी, सूत्रसंचालन विशेष शिक्षक संतोष देशमुख व शुभम बडगुजर यांनी केले. आभार अमोल फटाले यांनी मानले. यावेळी विद्यार्थ्यांना, पालकांना वाहतुकी साठी बसेस तसेच काकंपनीच्या वतीने बसेस नाश्ता व जेवणाची उत्तम व्यवस्था केली होती. साहित्य साधने मिळाल्याने पालक व विद्यार्थी यांच्या चेहऱ्यावर वेगळीच समाधानाची भावना होती.

# वारकरी संप्रदायाचा मानबिंदू ह.भ.प. बापूराव केंद्रे यांचे निधन


**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**किनवट - प्रतिनिधी**
**शुभम शिंदे**



**किनवट :** शनिवारपेठ येथील ज्येष्ठ नागरिक, निष्ठावंत वारकरी, वारकरी संप्रदायाचा मानबिंदू व उत्कृष्ट मृदंगवादक ह.भ.प. बापूराव सखाराम केंद्रे यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी सोमवारी (दि. २२ डिसेंबर) दुःखद निधन झाले. मंगळवारी (दि. २३ डिसेंबर) शेकडो भाविकांच्या उपस्थितीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन सुना, दोन नातू व दोन नाती असा परिवार आहे. ह.भ.प. बापूराव केंद्रे यांनी सुमारे सत्तर वर्षांपूर्वी शनिवारपेठ येथे अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा सुरू केली. बोधडी बु., बोधडी खु., येन्दा, पेन्दा, सावरी, दाभाडी, दरसांगवी, प्रधानसांगवी, निचपूर आदी अनेक गावांतील हरिनाम सप्ताहात त्यांनी सातत्याने सेवा दिली. अखंड हरिनामाचे बीजारोपण करून त्यांनी भजनज्योत अखंड तेवत ठेवली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक शिष्य घडले. आयुष्याची तब्बल सत्तर वर्षे त्यांनी परमार्थासाठी अविरतपणे वाहिली. त्यांच्या कार्याचा गौरव जिल्हा दिशा समितीचे सदस्य मारोती सुंकलवाड, विष्णू कराड तसेच ह.भ.प. शिरफुले महाराज यांनी शोकसभेदरम्यान केला. त्यांच्या निधनाने वारकरी संप्रदायावर शोककळा पसरली आहे. आज त्यांच्या ज्येष्ठ पुत्र नागनाथ केंद्रे यांनी अग्नीसंस्कार केल्याने ते पंचत्वात विलीन झाले.

# भोकरदन पंचायत समिती कार्यालयात शेतकऱ्याने बोकड आणून बांधला

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**मंठा - प्रतिनिधी**
**सुरेश ज्ञा. दवणे**



**जालना :** भोकरदन पंचायत समिती कार्यालयात करजगाव येथील शेतकरी आंनदा कानडे याने गटविकास अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उदासीन धोरणाला कंटाळून अनोखे आंदोलन केले आहे.वर्ष उलटून देखील सिंचन विहीर,गायगोठ्याला गटविकास अधिकारी मंजुरी देत नसल्याने बोकड पंचायत समिती कार्यालयात आणून बांधला व जोपर्यंत गायगोठा मंजूर करत नाही तोपर्यंत बोकड पंचायत समितीत बांधणार असल्याचा निर्धार शेतकऱ्याने केला. या आंदोलनामुळं कर्मचाऱ्यांची चांगलीच धांदल उडाली. पंचायत समितीत शेतकऱ्यांचे अनेक प्रस्ताव देखील गहाळ झालेले आहे. यामुळं शेतकऱ्यांचे कामे मात्र रखडले जात आहे. या शेतकऱ्याने यापूर्वी देखील सिंचन विहीर व गाय गोठा मंजुरी साठी दोन वेळेस उपोषण केले, जिल्हा परिषदला आंदोलन केले, झाडावर चढून गळ्यात फास लटकून आंदोलन केले. मात्र दरवेळेस फक्त गटविकास अधिकाऱ्यांडून आश्वासन दिले गेले. भोकरदन पंचायत समिती अनागोंदी कारभाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी होत आहे. दोन दिवसापासून कडाक्याच्या थंडीत सामाजिक कार्यकर्ते नारायण लोखंडे, विकास जाधव यांचे देखील उपोषण सुरु आहे. मात्र गटविकास अधिकाऱ्यांकडून व तहसीलदारांकडून मागण्यांची पूर्तता न केल्यामुळं उपोषण सुरूच आहे.

> वर्षभरापासून पंचायत समिती कार्यालयात चकरा मारून मारून थकलो आहे. सिंचन विहीर व गायगोठा मंजूर करण्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांची अनेकदा भेट घेतली व निवेदनही दिले.मात्र उडवा उडविची उत्तरे दिली जातात. माझ्या गावातील ज्या शेतकऱ्यांनी काम मंजूर करण्यासाठी पैसे दिले त्याच शेतकऱ्याचे कामे मंजूर झाले. माझ्याकडे द्यायला पैसे नसल्यामुळं मला वेळोवेळी संघर्ष करून देखील हक्काच्या योजनेपासून वंचीत आहे.त्यामुळं मी बोकड पंचायत समिती कार्यालयात आणला आहे व इतर जनावरे देखील चारा पाणी घेऊन येणार आहे.
>
> **आनंद कानडे – शेतकरी करजगाव**

# पुस्तकी शिक्षणासोबतच मिळालं व्यवहार ज्ञान!

## श्रीनारायणदास रामदास स्कूलमध्ये 'राष्ट्रीय गणित दिना'निमित्त अनोखी भाजी मंडई

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
इंदापूर - प्रतिनिधी
बापू बोराटे



**पुणे (इंदापूर) :** पुस्तकी शिक्षणापलीकडे जाऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान मिळावे, या उद्देशाने श्री नारायणदास रामदास इंग्लिश मीडियम स्कूल, इंदापूर येथे भारतीय महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त 'राष्ट्रीय गणित दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून शाळेच्या प्रांगणात एक अनोखी व नावीन्यपूर्ण 'भाजी मंडई' भरवण्यात आली, ज्याला पालकांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या उपक्रमात तब्बल २४० विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला असून, केवळ अवघ्या दोन तासांत सुमारे ९० हजार रुपयांची उलाढाल झाल्याने हा उपक्रम विशेष चर्चेचा विषय ठरला. गणिताचे आकडे, हिशोब, नफा-तोटा, देवाण-घेवाण आणि ग्राहकांशी संवाद या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांनी खेळत-हसत अनुभवातून शिकल्या.

शाळेच्या आवारात भरलेल्या या मंडईत विद्यार्थ्यांनी स्वतः विक्रेत्याची भूमिका निभावत ताज्या पालेभाज्या, फळे विक्रीसाठी ठेवल्या होत्या. यासोबतच 'खाऊ गल्ली' हे या उपक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. वडापाव, इडली-सांबार, पाणीपुरी, सुरळीची वडी, तिळाची वडी, खरवस, मेदू वडा, कच्ची दाबेली, भेळ, मंचुरियन यांसारख्या विविध खाद्यपदार्थांसह चहा आणि विविध फ्लेवरची रबडी यांची चव उपस्थितांनी मनसोक्त लुटली.

काही विद्यार्थी विक्रेत्याच्या भूमिकेतून माल विक्री करत होते, तर काही विद्यार्थी ग्राहक बनून खरेदीचा आनंद घेत होते. या संपूर्ण प्रक्रियेतून विद्यार्थ्यांना पैशांचे व्यवस्थापन, गणिती हिशोब, व्यवहारज्ञान आणि संवाद कौशल्य (Communication Skills) प्रत्यक्ष अनुभवता आले. पालकांनीही या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद देत विद्यार्थ्यांकडून खरेदी केली आणि त्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाचे मनापासून कौतुक केले. हा अभिनव उपक्रम इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष हर्षवर्धनजी पाटील यांच्या प्रेरणेतून तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. फौजिया शेख मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे राबवण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. विजयश्री डोंबाळे यांनी केले, सूत्रसंचालन सौ. रेहाना शेख यांनी केले, तर आभार प्रदर्शन अक्षय वजाळे यांनी मानले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या उपक्रमामुळे गणित हा विषय केवळ पुस्तकांपुरता मर्यादित न राहता तो दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग कसा आहे, हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून समजले. आनंद, उत्साह आणि शिकण्याची नवी दिशा देणारा हा उपक्रम शिक्षण क्षेत्रात निश्चितच प्रेरणादायी ठरला आहे.

# नोकरी नाकारून शेती स्वीकारली; संघर्ष जिंकत गाठली शंभरी

## नाना पाटीलांची प्रेरक कहाणी !

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
पालघर - प्रतिनिधी
मिलिंद चुरी



**स्वातंत्र्यपूर्व शिक्षण, शेतीवर उभारलेले कुटुंब आणि समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा झाला धनेश (नाना) पाटील यांचा शताब्दी अभिष्टचिंतन सोहळा**

**पालघर :** 'जीवेत शरदः शतम' या उक्तीचा प्रत्यय देणारा शतायुषी अभिष्टचिंतन सोहळा कुडण-पाटीलपाडा (ता. जि. पालघर) येथे मोठ्या उत्साहात पार पडला. वंदनीय धनेश (नाना) पिलाजी पाटील यांनी आयुष्याची शंभर वर्षे पूर्ण केल्याबद्दल कुटुंबीय, नातेवाईक आणि ग्रामस्थांनी त्यांचा सन्मान केला.

१७ डिसेंबर १९२५ रोजी जन्मलेल्या नानांनी स्वातंत्र्यपूर्व काळातच, सन १९४२ मध्ये जुनी एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण केली. उच्च पदाची नोकरी मिळण्याची संधी असतानाही त्यांनी नोकरी न स्वीकारता स्वतंत्र शेती व्यवसायाचा मार्ग निवडला. प्रामाणिकपणा, कष्ट आणि चिकाटीच्या बळावर त्यांनी आपले आयुष्य घडवले.

१९४५ साली त्यांचा विवाह झाला. मात्र १९६८ मध्ये पत्नी यशवंती यांचे अकाली निधन झाल्याने पाचही मुलांची जबाबदारी एकट्याच खांद्यावर आली. शेतीतील कष्ट, वाडीतील परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी मुलांचे पालनपोषण व शिक्षण पूर्ण केले. आज त्यांच्या कुटुंबात सौ. छाया चंद्रकांत राऊत, बाळू धनेश पाटील, स्व.बंड्या धनेश पाटील, सौ. निता विनोद किणी आणि राजू धनेश पाटील असा परिवार आहे.

प्रेमळ, मनमिळावू, संयमी आणि आनंदी स्वभावामुळेच नानांनी शंभराव्या वर्षापर्यंत निरोगी आयुष्य जगल्याचे अनेकांनी नमूद केले. दहा भाऊ व तीन बहिणींच्या मोठ्या पाटील कुटुंबामुळेच त्यांच्या वस्तीला 'कुडण पाटीलपाडा' असे नाव पडल्याचा उल्लेखही यावेळी करण्यात आला.

अभिष्टचिंतन सोहळ्यात नानांची धान्यतुला करण्यात आली. त्यातून जमा झालेले धान्य तारापूर-कांबोडे येथील वृद्धाश्रमाला भेट देऊन समाजभान जपण्यात आले. कार्यक्रमाला अनेक सन्माननीय व्यक्ती, नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रमंडळी, ज्येष्ठ नागरिक संघ कुडणचे पदाधिकारी तसेच साई मित्र मंडळ पाचमार्गचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी सौ.नयना जितेंद्र राऊळ, प्रतिभा किणी, मनोज पाटील, अशोक पाटील, वनमाला पाटील, चांदणी चौधरी, स्मिता म्हात्रे, पूजा पाटील यांनी नानांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भालचंद्र म्हात्रे यांनी केले. सूत्रसंचालन व नियोजन प्रा. संजय घरत यांनी केले. तर ज्येष्ठ पुत्र बाळू धनेश पाटील यांनी वडिलांच्या संघर्षमय आणि प्रेरणादायी जीवनप्रवासाचे मनोगत व्यक्त करून उपस्थितांचे आभार मानले. कष्ट, संस्कार आणि समाजभान यांचा संगम असलेला हा शताब्दी सोहळा उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

# शाळेत राष्ट्रीय गणित दिन विविध शैक्षणिक उपक्रमांनी साजरा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
उमरगा - प्रतिनिधी



**उमरगा :** उमरगा तालुक्यातील येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कंटेकुर येथे राष्ट्रीय गणित दिन मोठ्या उत्साहात व शैक्षणिक वातावरणात साजरा करण्यात आला. महान भारतीय गणितज्ञ डॉ. श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाविषयी रुची निर्माण करणे व गणिताची भीती दूर करणे हा होता.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी शाळेतील सेवा जेष्ठ शिक्षक लक्ष्मण येवते तसेच शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविकात श्रीमती तनुजा गाढवे यांनी राष्ट्रीय गणित दिन साजरा करण्यामागील भूमिका स्पष्ट केली. या दिवशी विद्यार्थ्यांसाठी गणित प्रश्नमंजुषा, गणित कोडी, सूत्र लेखन स्पर्धा, गणितीय खेळ, पोस्टर सादरीकरण, गणितीय आकृती व मॉडेल प्रदर्शन अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने व आत्मविश्वासाने सहभाग घेतला. काही विद्यार्थ्यांनी गणितीय संकल्पना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमप्रसंगी गणित मित्र लतिफ लदाफ यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. रामानुजन यांच्या गणित क्षेत्रातील अमूल्य योगदानाचा आढावा घेतला. तसेच गणित हा केवळ पाठांतराचा विषय नसून तो समजून घेतल्यास अत्यंत सोपा व मनोरंजक ठरतो, असे मत त्यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी नियमित सराव व तर्कशुद्ध विचार केल्यास गणितात निश्चित यश मिळवता येते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी कु. सूर्यजनी अचलेरे यांनी केले तर आभारप्रदर्शन शिक्षक श्रीम चित्ररेखा दंडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

राष्ट्रीय गणित दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेले हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासास पोषक ठरले असून गणित विषयाविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यास मदत झाली.

# तालुकास्तरीय सांघिक व मैदानी स्पर्धा चे आयोजन

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
दौंड - प्रतिनिधी
अंकुश काळे



**प्रयोजक :-अल्काईल अमायन्स कुरकुंभ**
**आयोजन :-श्री फिरंगाई मा. उच्च मा. विद्यालय कुरकुंभ.**

**दौंड :** दौंड तालुक्यातील कुरकुंभाळवल मधील अल्काईल अमायन्स कंपनी तर्फे खूप लोक उपयोगी उपक्रम राबवले जातात वेळो वेळी मदत पोचली जाते. ह्या वेळी परिसरातील विध्यार्थ्यां साठी त्यांच्यातील कला गुण जोपसण्या साठी हा उपक्रम राबवला आहे. त्या मध्ये शाळेचे प्राचार्य बी डी शितोळे सर यांचा खास सहभागातून असा उपक्रम उदयास आला आहे.

दिनांक २२ डिसेंबर २०२५ ला या स्पर्धे चे उदघाट्न मान्यवरच्या च्या हस्ते करण्याचे ठरवले आहे ह्या स्पर्धा दिनांक २४ दिसेबर पर्यंत चालू राहतील अशी माहिती प्राचार्य शितोळे सर यांनी दिली. या स्पर्धा मध्ये विजयी संघाला पहिले बक्षीस ४ हजार दुसरे ३ हजार तिसरे २ हजार तर मैदानी खेळाना ५०० ३०० आणि २०० अशी बक्षिसे ठेवली आहेत. थाळी फेक,गोळा फेक, रस्सी खेच, धावणे तसेच रिले असे खेळ ठेवली आहेत. मान्यवरामध्ये उदघाटन दौंड चे तहसीलदार अरुण शेलार सर कार्यकर्माचे अध्यक्ष म्हणून कुरकुंभ गाव चे सरपंच सुनिल खंडाळे यांनी उपस्ति ती दाखवली प्रमुख पाहुणे म्हणून दौडं पोलीस स्टेशन चे सह पोलीस निरीक्षक श्रीरंग शिंदे सर अरुण मरगळ ( गट विकास अधिकारी), संजय शितोळे माजी सरपंच कुरकुंभ जालिंदर आवारी (किर्डा शिक्षक संघटना) श्रीमती अशा घाडगे (केंद्र प्रमुख) श्री केशव राज शितोळे( उत्कर्ष शिक्षण संस्थ) डॉ कोल्हे (मेडिसिन) अल्काईल कंपनी तर्फे राजेश कावळे सर आणि प्रवीण माने हे उपस्थित होते या मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमांची शोभा वाढवली व मार्गदर्शन केल विध्यार्थी यांना खेळाचं महत्व समजावून सांगितले. आणि सर्व शिसक आणि कर्मचारी यांनी खुप मेहनत घेतली परिसरातील शिक्षण संस्थेतून सहभाग घेऊन खेळा मध्ये सहभाग नोंदवाल मुलांचा उत्सहात खेळाला सुरुवात केली.

# राशि भविष्य

**मेष :** तुमची उच्च कोटी ऊर्जा आज चांगल्या कामासाठी वापरा. जीवनाच्या वाईट कामात पैसा तुमच्या कामी येईल म्हणून, आज पासूनच आपल्या पैश्याची बचत करण्याचा विचार करा अथवा तुम्हाला समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

**वृषभ :** तुम्हाला एखाद्या धार्मिक स्थळी जाण्याची इच्छा होईल. त्यासाठी तुम्ही धार्मिक स्थळी जाऊन ज्ञानी-योगी-दैवी व्यक्तीला भेटून त्यांच्यादजवळून ज्ञान मिळवाल, आशीर्वाद मिळवाल.

**मिथुन :** तुमचे आवडते स्वप्न प्रत्यक्षात येईल. परंतु तुमचा उत्साह नियंत्रणात ठेवा. कारण खूप आनंदी होणे हे कधी कधी समस्येत टाकू शकते.

**कर्क :** शारीरिक सुदृढतेसाठी विशेषत: मानसिकदृष्ट्या कणखर बनण्यासाठी ध्यानधारणा आणि योगासने करा. दिवसाच्या सुरवातीत तुम्हाला आज आर्थिक हानी होऊ शकते ज्यामुळे संपूर्ण दिवस खराब होऊ शकतो.

**सिंह :** आपले मानसिक आणि शारीरिक आरोग्य संतुलित राखा, अध्यात्मिक आयुष्याचे हे पूर्वसूत्र आहे. 'सर्व चांगल्या आणि वाईट गोष्टी मनातूनच जन्माला येतात त्यामुळे मन हे जीवनाचे प्रवेशद्वार आहे.

**कन्या :** संयम बाळगा, आपले निंरतर प्रयत्न आणि समजून घेण्यामुळे आपणास हमखास यशप्राप्ती होणार आहे. प्रलंबित देणी आल्यामुळे आपली सांपत्तिक स्थिती सुधारेल.

**तुळ :** तुमच्या विनोदबुद्धीमुळे तुम्ही एखाद्या व्यक्तीला विनोदबुद्धी अंगी बाणवण्यासाठी उद्युक्त कराल. कारण तुम्ही त्या व्यक्तीला सांगाल की आनंद हा वस्तूंच्या मालकीमध्ये नसतो तर तो तुमच्या आतमध्ये दडलेला असतो.

**वृश्चिक :** चांगल्या सुदृढ आरोग्यासाठी लांबवर चालत जा. आज तुम्हाला धन संबंधित काही समस्या असण्याची शक्यता आहे परंतु, तुम्ही तुमच्या कौशल्याने हानीला ही नफ्यामध्ये बदलू शकतात.

**धनु :** आपले मानसिक आणि शारीरिक आरोग्य संतुलित राखा, अध्यात्मिक आयुष्याचे हे पूर्वसूत्र आहे. 'सर्व चांगल्या आणि वाईट गोष्टी मनातूनच जन्माला येतात त्यामुळे मन हे जीवनाचे प्रवेशद्वार आहे.

**मकर :** प्रकृतीची काळजी घ्या आणि सर्व गोष्टी व्यवस्थित करा. तुमच्या जीवनसाथी सोबत मिळून आज तुम्ही भविष्यासाठी काही आर्थिक योजना बनवू शकतात .

**कुंभ :** चांगल्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. जे लोक लघु उद्योग करतात त्यांना आजच्या दिवशी आपल्या कुठल्या ही जवळच्या लोकांचा सल्ला मिळू शकतो. ज्यामुळे आर्थिक लाभ ही मिळण्याची शक्यता आहे.

**मीन :** अनावश्यक तणाव आणि चिंता यामुळे तुमचा दिवसभराचा आनंद मावळेल. यावर मात करा अन्यथा समस्या अधिक गंभीर बनेल.

# थंडीत वाढतोय हृदयविकाराचा धोका

## तरुणांमध्ये प्रमाण सर्वाधिक

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
औंध - प्रतिनिधी
निहाल मणेर



**औंध :** हिवाळ्याच्या दिवसांत तापमानात घट होत असताना हृदयविकाराच्या रुग्णसंख्येत चिंताजनक वाढ होत असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे २५ ते ४५ वयोगटातील तरुणांमध्ये हृदयविकाराचा धोका अधिक वाढताना दिसत असून, आरोग्य तज्ज्ञांनी याबाबत गंभीर इशारा दिला आहे. पूर्वी वयोवृद्धांपुरता मर्यादित मानला जाणारा हृदयविकार आज बदलत्या जीवनशैलीमुळे तरुण पिढीलाही वेगाने ग्रासू लागला आहे.

थंडीमुळे शरीरातील रक्तवाहिन्या आकुंचन पावतात. परिणामी रक्तदाब वाढतो, रक्तप्रवाहावर ताण येतो आणि हृदयाला अधिक मेहनत घ्यावी लागते. सकाळच्या वेळेत तापमान अत्यल्प असल्याने याच काळात हार्ट अटॅकच्या घटनांचे प्रमाण जास्त आढळते. ग्रामीण भागात अनेकदा लक्षणांकडे दुर्लक्ष होत असल्याने वेळेवर उपचार मिळत नाहीत, ही बाब अधिक धोकादायक ठरत आहे. डॉक्टरांच्या मते, ताणतणाव, अपुरी झोप, व्यायामाचा अभाव, धूम्रपान, मद्यपान आणि जंक फूडचे वाढते सेवन ही हृदयविकार वाढण्यामागची प्रमुख कारणे आहेत. छातीत जडपणा, डाव्या हातात किंवा मानेत वेदना, श्वास लागणे, अचानक घाम येणे, चक्कर येणे ही हृदयविकाराची प्राथमिक लक्षणे असून अशी लक्षणे जाणवताच तात्काळ रुग्णालयात दाखल होणे अत्यावश्यक आहे.

**हिवाळ्यात हृदयविकाराचा धोका का वाढतो?**

थंडीमुळे रक्तवाहिन्यांचे आकुंचन
वाढलेला रक्तदाब व कोलेस्टेरॉल
सकाळी अचानक जड श्रम किंवा व्यायाम
ताणतणाव व अपुरी झोप

**काय काळजी घ्यावी?**

शरीर गरम ठेवण्यासाठी योग्य कपड्यांचा वापर
रोज हलका व्यायाम व चालणे
नियमित रक्तदाब, साखर व कोलेस्टेरॉल तपासणी
संतुलित आहार व पुरेशी झोप

### ✻ डॉक्टरांचा सल्ला

आपण ज्या ठिकाणी झोपतो त्या ठिकाणचे तापमान २४ ते २६ अंश सेल्सिअस ठेवा.

हिवाळ्यात सकाळी अचानक छातीत वेदना, श्वास घेण्यास त्रास अशी लक्षणे दिसताच विलंब न करता तात्काळ रुग्णालयात जावे, 'मी तरुण आहे, मला काही होणार नाही' हा गैरसमज जीवघेणा ठरू शकतो. वेळेवर तपासणी, योग्य जीवनशैली आणि जागरूकता हाच हृदयविकारापासून बचावाचा खात्रीशीर मार्ग आहे.


Om Dental Care & Implant Centre
Shree nagar, Nanded.
डॉ. विवेक टापरे
बी.डी.एस.
मो. 9096968440
ॐ
डेंटल इंम्प्लांट | रुट कॅनल | ऑर्थोडोंटीक
ॲडव्हान्स डेंटल हॉस्पीटल

पत्ता : राज मोहम्मद कॉम्प्लेक्स, पहनावा ड्रेसेस जवळ, मेन रोड, श्रीनगर, नांदेड.